# अलवार

(ऋतुंवरील काव्यसंग्रह – भाग १)

रचना

**डॉ. मंजूषा कुलकर्णी**

(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)

मंजुभारती प्रकाशन

**पुणे**

**अलवार** (ऋतुंवरील काव्यसंग्रह - भाग १)

**रचना** : डॉ. मंजूषा कुलकर्णी
(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)
साकेत / २५, जयवंत पालकर मार्ग,
पोद्दार रुग्णालयासमोर, वरळी, मुंबई - ४०० ०३०.
भ्रमणध्वनी - ९०८२१६१५२४, ९८२२८३९४९१
Email : dr.manjushak@gmail.com

**कायमस्वरूपी पत्ता :** २३१, समर्थ अलंकार, फ्लॅट-२, कवितांच्या बागेसमोर,
ज्योतीनगर, छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००५.

**प्रकाशक** : सौ. उल्का मंगेश कुलकर्णी
**मंजुभारती प्रकाशन**
'अे' ५०४, महालक्ष्मी पॅलेस, वेंकटेश शर्विल सोसायटी समोर,
सी.एन.जी. पंपासमोर, पारी कंपनी चौक,
नऱ्हे, पुणे - ४११०४१.

**प्रथम आवृत्ती** : फाल्गुन शु. ८, दुर्गाष्टमी, शके १९४५
रविवार, दि. १७ मार्च, २०२४

**अक्षर जुळवणी** : सौ. अनिता विनायक भालेराव
क्रिएशन,
जयश्री, एन-१, सिडको, छत्रपती संभाजीनगर - ४३१००३.
भ्रमणध्वनी - ९४२३३ ९६८८१

**मुद्रक** : स्टार कॉपीयर्स प्रायव्हेट लिमिटेड
कुमठेकर मार्ग, सदाशिव पेठ, पुणे ३०

**ISBN** : 978-81-962298-5-3

**सर्वाधिकार** : © लेखिकेच्या स्वाधीन

**किंमत** : ₹ **१५०/-**

कविता या कवयित्रीचे स्वयं सर्जन असून कविता तयार झाल्यानंतर तिच्या सोबत वापरण्यात आलेले चित्र हे केवळ साहित्यिक आनंदासाठी वापरण्यात आलेले आहे. यात कुणाचाही कॉपीराईट भंग करण्याचा मुळीच हेतू नाही. या सर्व कवितांचा उद्देश भाषेचा प्रसार व प्रचार इतकाच आहे.

# समर्पण



**विश्वनाथ वामन बापट उपाख्य वसंत बापट,**
**ज्यांनी मराठीत विपुल लेखन करीत काव्याचा सह्यकडा सर केला**
**आणि मराठी व संस्कृत भाषेत स.प महाविद्यालय पुणे येथून**
**शिक्षण घेत पुढे रुईया महाविद्यालय,मुंबई येथे संस्कृतचे प्राध्यापक**
**झाले; १९९९ साली ७२ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य**
**संमेलनाचे अध्यक्षपद भूषविले तसेच आपल्या लेखणीचे सामर्थ्य**
**कविताविधेतून प्रस्थापित करणाऱ्या ह्या मराठी ज्येष्ठ कवीस**
**ही माझी काव्यकृती विनम्र समर्पित!**

# मनोगत

ऋतुंमुळेच माणसाचं आयुष्य वेगवेगळ्या बहरांनी उमलून येतं. सर्व ऋतू आपापल्या वेगवेगळ्या सौंदर्याने नटलेले असतात. अगदी पानगळतीचा शिशिर जरी म्हटला तरी त्याचं एक स्वतःचं आपलं असं सौंदर्य आहेच. मुळातच ऋतू हे पृथ्वीच्या सौंदर्यात भर टाकण्यासाठी येतात. ग्रीष्माची काहिली सुद्धा नंतर येणाऱ्या वर्षा ऋतूची प्रारंभिक तयारी करून ठेवते. ग्रीष्माचं एक आपलंच लावण्य आहे.

ऋतुंमुळे वातावरणात होणारे बदल, निसर्गात होणारे बदल, उमलणारी झाडं, वेली, फळं -फुलं या सर्वांमुळेच आयुष्यात बदल होतो,परिवर्तन तयार होते. ऋतू नसते तर माणसाचं आयुष्य एकसुरी झालं असतं, नीरस झालं असतं. निसर्ग सुद्धा एकसुरीच वाटला असता. परंतु ऋतुंमुळे सतत त्यात बदल होत राहतात. दर दोन महिन्यांनी वेगळेपण अनुभवायला येतं. सुख आणि दुःखाची जाणीव सुद्धा ऋतुंमुळे सहज सुलभ होऊ लागते.

माणसाच्या जगण्याला समृद्ध करतात हे ऋतू. ऋतू अनेक आठवणींचे भांडार घेऊन येतात. प्रत्येक ऋतूची आपली एक खासियत असते, एक वैशिष्ट्य असतं, एक वेगळेपण असतं. कवीमनाला हे ऋतू कायम लुभावतात.

निसर्गाच्या कविता माझ्या हातून सर्वाधिक लिहिल्या जातात, त्यात ऋतू नसतील असं कसं होईल? त्यामुळे ऋतुंशी संबंधित किंवा त्या ऋतूंचं वर्णन करणाऱ्या ज्या कविता उतरल्या गेल्या, निर्माण झाल्या त्यांचा हा काव्यसंग्रह रसिकांच्या हाती देताना मनस्वी आनंद होत आहे.

ही ऋतूंची शोभा, हे ऋतुंचं लावण्य शब्दात उतरतं तेंव्हा तो ऋतू नसताना सुद्धा त्याची अनुभूती येऊ लागते. कवीच्या मनाला तर कोणताही ऋतू कोणत्याही क्षणी अनुभवता येतो, हे एक वेगळंच सौख्य असतं. अगदी दुःखाच्या अवस्थेत सुद्धा सुखद ऋतू त्याला उभे करता येतात आणि सुखद क्षणी सुद्धा विविध अन्य भावनांना साकारता येतं. ऋतू शब्दात मांडताना त्यातला तो गोडवा आपोआपच कल्पनांमधून, शब्दरचनेमधून, भावसौंदर्यातून उतरत जातो आणि प्रत्येक ऋतू बहरून येतो. हा ऋतुंवरील काव्यसंग्रह रसिकांच्या पसंतीस उतरेल असा विश्वास वाटतो.

**डॉ. मंजूषा कुलकर्णी**

# प्रस्तावना

आज मुक्तछंदाच्या काळांत कविता हरवतेय का असं वाटत असतांना हा कविता संग्रह वाचायला मिळाला. वृत्त, छंद, गेयता, हे शब्द सुद्धा मला वाटतं हळूहळू कालबाह्य होतील की काय अशी परिस्थिती पाहत असतांना, वाळवंटात हिरवळ आढळावी तशी ही कविता वाटली. फारसा विद्वत्तेचा बाऊ न करता; पण आणि व्याकरणाची संपूर्ण बूज राखत केलेलं लिखाण आज अगदी ताजंतवानं करून सोडतं.

आपलं आयुष्य जर फक्त एकच वर्ष असतं तर ....?

या एकाच वर्षांत सहाही ऋतू पहायला मिळाले असते ना? आणि माझ्या नजरेनं पाहता मला प्रत्येकाच्याच आयुष्यांत हे सहाही ऋतू आढळत जातात फक्त त्यांचा क्रम कसा राहील ते मात्र प्रत्येकाच्या कर्तृत्वावर आणि प्राक्तनावर अवलंबून असतं.

यांतील प्रत्येक कविता ही वेगवेगळा बाज घेऊन आलेली दिसते आणि ती स्वत: त्या त्या ऋतू गंधांत माखून घेते. वर्षा काळी कोकणांतला चाकरमाणी, गंध मातीचा पसरे म्हणत सारा कोकण फुलतो असं म्हणत कसा रमतो माणूस, माणुसकी हरीभरी म्हणत स्वत:तच आनंद शोधतांना दिसतो. वर्षा ऋतूंवर कवयित्री जरा जास्तच फिदा वाटते. अगदी ग्रामीण ढंगात वर्षा मांडतांना न कळत प्रेम उलगडत जातं. **......काळा कातळ डोंगुर तिला पांघरून गेला.**

यथा पिंडी ते ब्रम्हांडी असं आपण नेहमीच म्हणत असतो, पण हेच नातं कवयित्रीनं अतिशय सुरेखपणे रूप वेगळे म्हणतच त्या म्हणतात, **अन्? ब्रह्मांडीजीवन अंडी चक्र असे दिसतसे.**

वसंताची चाहूल लागते तेव्हां, बहुसंख्य कवींप्रमाणेच यांनी सुद्धा वसंताला शृंगारांत गुंतवलेलं दिसतं.

शिशिर, हेमंतालाही प्रणय बंधनात अडकवतांना, **लाज वाहे रोम रोमी मीलनाच्या शर्वरी**... असं म्हणत ऋतुला मात्र घट्ट कवेत धरलेलं दिसतं. हे सारं करत असताना कुठेही छंद भंग मात्र होत नाही याची पुरेपूर काळजी घेतलेली आढळते. अर्थात काही जागी त्यामुळं मूळ शब्दावर अन्याय झालाय का? अशी शंका येते. शिशिरावर अन्याय करायचा नाहीच; पण स्वतःचा हेका सांभाळताना

**होती बहार तेंव्हा गोकुळ नांदलेले,**

**माझेच श्वास आता आहेत कोंडलेले**

वाचताना जीव उगाचच पिळवटून जातो.

निसर्ग कविता हा प्रान्त वाटतो तेवढा सोपा नसतोच हे पदोपदी जाणवतं. बहाव्याचा बहार असो वा धुक्यात हरवलेले क्षण असोत, कवयित्री कुठेही कमी पडली आहे असं वाटत नाही.

आम्ही नेहमीच **नि:सुखत्वं सुखाय च** म्हणत असतो. त्याचा प्रत्यय वैशाख वणव्याचा आनंद घेतांना जाणवला. वळवाच्या पावसानं येणारा मृद्गंध श्वासालाही परिमळीत करतो ही कल्पना तर खूपच भावली.

शेतकऱ्यानं पेरणी उरकवून आभाळाकडं पहात बसावं, नुकत्याच उगवलेल्या पिकांनी माना टाकलेल्या असतांना त्याला मिळणारं चैतन्य मनाला खरोखरंच उभारी देऊन जातं.

इंद्रधनुची सात रंगाची रंगावली, पावसाळी पहाट फुलवत नेते. मोहरणारा ऋतू पानोपानी लाजत जलबिंदूंचेच मौक्तिक हार, सरसर सुखांत चांदण्याची बरसात करतात हे विलोभनीय वाटतं. वर्षा ऋतूचं कौतूक मात्र सरता सरत नाहीच, **.....असा सोहळा टिपून घ्यावा भाग्य उजळता भाळी** म्हणत कवयित्री शेवटी तुमच्याच भाग्यावर येते. कदाचित या मुळेच **घरे देखणी सधन ती परि, माया तेथ नाही. मज देशी झोपडीत, गळण्यास जागा काही**. असं म्हणत असावी. शहरांत वाढलेले असूनही गांवाकडची ओढ मात्र जाणवत राहतेच. अंगण, परस, बांध, वाडे यांचं वेड जाणवतंच.

**झाड मानवी सुकू न द्यावे, अशा सुखाचे गाणे गावे** या आणि अशा ओळी जिवंतपणा ताजा ठेवतात, काळ कितीही बदलला वा भौतिक सुखांमुळे

आम्ही कितीही भरकटलो तरीही पुन: त्याच वाटेवर आणणारी ही कविता नक्कीच वाचकांस भावणारंच यांत मला तरी शंका वाटत नाही.

**अजूनही ऋतू बहरून फुलतो, तुझ्या येण्याची वाट पहात ग्रीष्मांतही** अशी आशा नव्हे तर खात्री देणाऱ्या ओळी मन सुखावतात. ओलाव्याच्या रम्य कथा वाचत असतांनाच कोसळतांना दिसणे सुंदर मन मोहविते यांत शंका नाही. शरदाचं चांदणं असो वा गारवा, दवांची माळ वा थंडी गुलाबी, हे सारेच ऋतूंना सुद्धा बहारायाला लावतात आणि त्यासाठी अगदी चपखल शब्द प्रयोग **''बहारांस जुंपतात''** खासंच वाटतो.

या लिखाणाला काय म्हणावं हा मलाच पडलेला प्रश्न – हे समग्र रसग्रहण नाही, केवळ टिकाटिप्पणी नाही वा समीक्षा तर नाहीच नाही (मी समीक्षा शब्द सुद्धा वापरायच्या योग्यतेचा नाही याची मला नम्र जाण आहे.) कुणी काय म्हणावं हे मी सूज्ञ वाचकांवरच सोडतो. कवयित्रीच्याच शब्दांत अखेर जीवनाची रंगावली मांडत निरोप घेतोय .....

**कोण तो वेडा कसा रे,**
**निर्मितो रंगावली**
**जाणता रंगास त्याच्या**
**पावली हो पावली.**

**वैद्य. रत्नाकर लोंढे**
अंबिका आयुर्वेद,
परभणी

# अनुक्रमणिका


१) विद्युता मज सखी वाटते... ११
२) मनी पंचप्राण गोळा ... १२
३) प्रेम जाते बरसून ... १४
४) आज नव्या वाटे गेला ... १५
५) बर्फान्डे ... १६
६) असा सांडला ऋतू भुईवर ... १७
७) वर्षाराणीच्या वाटेस डोळे ... १८
८) मीलनाचे साक्षी दव ... १९
९) धुकाळलेली ही सकाळ... २०
१०) या अशा पावसाळी... ... २१
११) होती बहार जेव्हा ... २२
१२) फुलून मोगरा सांगत आहे ... २४
१३) होशील का रे सखया ... २६
१४) बहरून आला बहावा ... २७
१५) त्या धुक्यातील त्या क्षणांना ... २८
१६) शिकवण वैशाखाची ... २९
१७) थेंबकळ्या पावसाच्या बहरल्या मनात ... ३०
१८) त्याचा चैतन्याचा चाळा ... ३१
१९) सात रंगांची रंगाळी ... ३२
२०) पावसाळी ही पहाट ... ३३
२१) पान पान लाजाळू रे ... ३४
२२) अन् हा ऋतू मोहरला ... ३५
२३) सर थेंब मोतीयाची ... ३६
२४) मन पाऊस पांघरी ... ३७
२५) फिटे पारणे दो नयनांचे ... ३८
२६) थेंबराण्या पावसाच्या ... ३९
२७) पुन्हा गुंतलो थेंबांमधुनी ... ४०
२८) हिरवी गाणी हिरव्या ऋतूची ... ४१
२९) हे चक्र ऋतूंचे ऐसे ... ४२
३०) कशी सावरू आभाळा ... ४३
३१) ओलावा तिथे खास ... ४४
३२) झाड मानवी सुकू न द्यावे ... ४६
३३) प्रेम रंगते वरपांगी ना ... ४७
३४) मन रेशमाचं झालं ... ४८
३५) मन गुलाबाचे ... ४९
३६) पदतळी माझ्या सडा फुलांचा ... ५०
३७) वसंत गाली हसला ... ५१
३८) मृद्गंध मोहवी मना ... ५२
३९) अजूनही मी ... ५३
४०) पावसाळी माझा छंद ... ५४
४१) गूज आपुले पाऊस होणे ... ५५
४२) म्हणूनही मी बरसून जातो ... ५६

४३) ऐक एवढे
बोल मैत्रीचे ... ५७
४४) दोन धुक्यांनी... ... ५८
४५) मिठीत विरघळल्या
तू पावसा ... ५९
४६) नेहमीच राहतील
बहर ऋतूंचे ... ६०
४७) शरदाच्या चांदण्यात ... ६१
४८) चांदणं ... ६२
४९) जरा रुजवावे
स्वत:ला ... ६३
५०) दान मिळेल नभाचे ... ६४
५१) मनसोक्त फुलून घ्या ... ६५
५२) ऋतू खुलावे
असे सोहळे ... ६६
५३) ऋतुराज रंगताना ... ६७
५४) अशा ऋतूची
कर आळवणी ... ६८
५५) ऋतू बहराचा सुंदर ... ६९
५६) ओलाव्याच्या
रम्य कथा ... ७०
५७) कोसळताना दिसणे
सुंदर ... ७१
५८) ऋतू मनात शरद हा ... ७२
५९) गारवा ... ७३
६०) माळ दवांची उरते ... ७४
६१) थंडी गुलाबी ... ७५
६२) ऋतूंना बहरा जुंपावे ... ७६
६३) पहाट ओली
दवात न्हाली ... ७७
६४) मोहक निखळसे
गाव सरळसे ... ७८
६५) जाणता रंगास त्याच्या ... ७९
६६) झिरमिरल्या
पाऊसधारा ... ८०



(१)

## विद्युता मज सखी वाटते

ही तडिता विद्युल्लता दामिनी
चमचमली गगनी
ऋतू वर्षावी सरीवर सरी
ही भेटण्यास आली अवनी

हिरवे हिरवे दुशालीतले
रम्य देखणे रूप क्षमेचे
पाहून उजळून देण्या आली
नभातुन वीजराणी प्रेम ते

फुले हासली दमकून उठली
हसली हसली वसुंधरा ही
आज सखी तिज भेटण्या आली
प्रकाश तनुवर लेऊन तीही

जलभरल्या जलदांनी केला
भुईवर सारा गुडुप अंधार
तेज शलाका होत कडाडे
आशा असते मनी निर्धार

कितीही असू दे पसरून गेला
तम साऱ्या या पृथ्वीवरती
आकाशातून एक प्रेरणा
चमचमून ती उजळून निघती

डोळे सारे दिपवून जाते
तेजस्वी अशी नभी चमकते
ही विद्युता मज सखी वाटते
मनातूनही उजळून निघते

दि.२६/०६/२०२०
सकाळी ०८.२१ वा.



## (२)
## मनी पंचप्राण गोळा

माझा कोकण मायाळू
बाप माय कनवाळू
त्याचं मन गरे गोड
संगे निसर्ग अजोड

माती पाणी ऊन वारा
कसा सुखाचा निवारा
विहीरीत बालपण
साऱ्या जगण्याचा थारा

असा पाऊस कोसळे
त्याची माया भारी इथं
मला भिजवून टाके
धार मुसळाची इथं

गंध मातीचा पसरे
त्यास सुवास पोफळी
आंबा महके तसाच
फणसंही गोड कळी

फुलं रानटी काटेरी
मन नाजूक तयांचे
दुःख विसरून मग
कसे हासणे तवाणे

घरं वेगवेगळाली
तरी मन एक इथे
सारे गाव एक घर
घरदार बोलणारे

कसा रमतो माणूस
माणुसकी हरीभरी
पोटापाण्यासाठी पोरं
होती चाकरमानी कीं

तरी गणपतीसाठी
सारी गावाकडं येती
सारा कोकण फुलतो
गोकुळाची सय व्हती

भाषा कोंकणी इथली
तिला गावरान माया
माय कोकणात ऱ्हाई
उतावीळ ती भेटाया

जरी राहतो शहरी
मन वाडीत हिंडतं
आंबा पोफळी नारळ
मनी फणस कोंडतं

शेत भाताची लगबग
दाणं ताटात पडती
त्यात तुपाची की धार
नदी गोरस दुभती

एकटं च बसावी की
जरा निवांत कुशीत
निसर्गची माय बाप
कसे येतात खुशीत

वारा झुलवी हिंदोळा
कानी बोले की पाचोळा
मनी पंचप्राण गोळा
असा सुरम्य सोहळा

दि.०७/१२/२०२०
दुपारी १२.३२ वा.



## (३)
## प्रेम जाते बरसून

बाहेर कसा पाऊस पडतोय गं
थंड वारा अंगाला झोंबतोय गं
आई तुझ्या कुशीत पहुडलो मी
म्याव म्याव गोड कसे गायलो मी

उठावसं वाटत नाही मला
तूही थकली असशील आराम हवा
दोघे आपण असेच बिलगून राहू
इथूनच पावसाच्या सरींना पाहू

ये ना बाळा सान सानुल्या
घट्ट धरीन छातीशी
ऊब माझी मिळताच तू
पापी देशील गोड अशी

थोड्या वेळामध्ये मग
दूध पिऊन घेशील
तोंडाला लागलेले
नीट पुसून घेशील

इकडून तिकडे उड्या मारून
पायात पायात येशील
लक्ष ठेव बाळा
तुडवला रे जाशील

आगाऊपणा करू नको
कपड्यांमध्ये दडू नको
शोधताना माझा जीव
वरखाली नेऊ नको

मायेने मी तुला
अंगावर खेळवीन
मऊ माझा हात तुझ्या
पाठीवर फिरवीन

पावसा पावसा जाऊ नको
इतक्यात तू
माय लेकरांचे प्रेम
जाते बरसून

दि.३०/०६/२०२०
सकाळी ८.५७ वा.



**(४)**

**आज नव्या वाटे गेला**

वाट गाभुळी गाभुळी
ओलसर सरी ल्याली
वर डोंगुर झाकोळा
धुक्यातून प्रीत आली

सरी सरसर त्याच्या
अंगावर पडत्यात
डोंगुराला गे शहारा
लाज सरीच्या व्हटात

आज ठरवलं तिनं
प्रेम सांगून टाकावं
धुकं ओढणी करावी
स्वतः झोकून टाकावं

प्रीत सरी बरसल्या
नग गोरामोरा झाला
काळा कातळ डोंगुर
तिला पांघरुन गेला

पायथ्याशी पायवाट
रोज भेटायाची त्याला
त्योबी रोजचाच हाय
आज नव्या वाटे गेला

दि.१९/०८/२०२०
सायं ६.२१ वा.




## (५)
## बर्फान्डे

वारा पाणी बर्फा घोळविती
बर्फान्डे आकारा
सृष्टीमधली सृष्टी विरळ ही
क्वचित ये साकारा

दुर्मिळ काही दृश्य दिसती या
ब्रह्मांडी अवचित
दृष्टी सौंदर्याची हवी बघ
असते रसिका खचित

एका अवनीवरती कोठे
ऊन अति तापते
कुठे बरसतो पाऊस वेडा
कणतनमन कापते

कुठे थंडीची अतिरेकाई
पाषाने गोठती
पाणीपाणी व्हावे वाटले
बर्फ वितळू पाहती

पण हा वारा धरुनी गारा
पाण्यासवे खेळतो
बर्फा अंगी घेऊन पाण्या
वरी असा लोळतो

गोलगोल तो फिरतो विरतो
मीलन होता दोन्ही
त्या दोघांच्या क्रीडेमधले
अंड जन्मते काही

जलराणी त्या वाऱ्यासंगे
एकरूप अशी होते
नव्या रूपाला त्या स्वरूपाला
उदरामध्ये घेते

प्रेम जसजसे बहरून येते
अंडे नवजन्माचे
रूप वेगळे दिव्य सोहळे
कोडे आकाराचे

अंडामधुनी ब्रह्मांडाची
उत्पत्ती होतसे
अन ब्रह्मांडी जीवन अंडी
चक्र असे दिसतसे

दि.१८/१२/२०२०
सकाळी ८.५७ वा.




## (६)
## असा सांडला ऋतू भुईवर

असा सांडला ऋतू भुईवर
लाली गाली धरा सैरभर
शालू प्रेमाचा पांघरला
फुले माळली अशी अंगभर

नाजूक साजूक मृदु पाकळ्या
लाजवीत त्या तिजसी सगळ्या
स्पर्श प्रियाचे होऊन गेल्या
मनात फुलल्या लाघववेळा

प्रीत गुलाबी उधाणलेली
अंगडाईतून विसावलेली
झाडझाडातून उमटली
वसुंधरा ही रती जाहली

मदनमंजिरी वेळीअवेळी
ऋतुविनाही बहरा आली
प्रेमपरिमळे सुमने फुलता
मने युगुलांची भरास आली

दाट गडद हा रंग गुलाबी
सर्वांगावर उमलत जाई
आणि धरणीच्या कुशीत प्रियवर
वसंत वेडा फुलून जाई

दि.२६/१२/२०२०
सकाळी ०९.५१ वा.



## (७)
## वर्षाराणीच्या वाटेस डोळे

खडक विराण हे बसले सुकले
वर्षाराणीच्या वाटेस डोळे
ती येईल ना उमलून उमडुन
बरसून जाईल क्षण चांगले

अंगावरती तिच्यामुळे जी
चैतन्याची ये हिरवाई
ती जाता मग देऊन जाते
विरहाची सोबत सांगाती

तिच्या स्मृतींनी तन सुकते हे
तन ना केवळ मनही सुकते
झोप न लागे निधड्या पहाडा
मनात मलमल प्रीत उमलते

वरवर कठोर किती भासतो
डोंगर वेडा उगाच हसतो
तिच्यासंगती क्षण रंगती
मनात मीलन गुंफत बसतो

ती आली की टिपटीप थेंबा
अंगावरती सांडून जाईल
मला विसरला म्हणून वेडी
लाडिक थोडे भांडून जाईल

तीही चिंब नि चिंब होई मी
भिजले क्षण ते ओलावताना
थोडे मीलन जरी आमुचे
होत धबधबे कोसळताना

आत जपतो मी प्रीतफुलाला
पाषाणाच्या आत ओलावा
तिचे नि माझे व्हावे मीलन
ऋतू सांडता स्पर्श बोलावा

दि.२६/१२/२०२०
सकाळी १०.२३ वा.



## (८)
## मीलनाचे साक्षी दव

या दवांना काय सांगू
आठवांच्या ओंजळी
पानावरती थांबलेल्या
स्वप्नवेड्या बिंदुळी

एक एका थेंबासाठी
थांबतो ऋतू ओघळे
वेडी बिथरे पानुली ही
श्वास चालती मोकळे

लव तिच्या अंगावरी
ये तरारून मल्मली
स्पर्श होता राजसाचा
गौरी होते शामली

लाज वाहे रोमरोमी
मीलनाच्या शर्वरी
रंग हिरवा गे मनाचा
पसरे लाली वरवरी

हे गुलाबी गाल होती
कंप होतो अंगी या
वेळ थांबे बिंदू बिंदू
दव दवाच्या रंगी या

पाहता या दवकणांना
रेशमाचे पाश रुळती
तो कुठे अन मी कुठे
परी प्रीतऋतू मनी रोज फळती

व्हा दवांनो साक्षी तुम्ही
लोचने मिटुनी जरा
साखरेची झोप त्याची
चुंबिलेली ती उषा

मीलनाची वाढे गोडी
पहाटवेळी गारवा
ही हवा बघ चिंबओली
श्वासामध्ये मारवा

शहारुनी येते ही काया
अंगी मदनाच्या खुणा
या दवांना काय सांगू
काय होते या मना

दि.०३/०१/२०२१
सायं ०६.१० वा.



## (९)
## धुकाळलेली ही सकाळ

धुक्याच्या पडद्यामागे
लपवला रविराजाला
सारे सारे न्याहाळता
चलबिचल उषामनाला

रोज रोज पाहती त्याला
लोक किती नजर ती लागे
सुंदराचे रूप दिनकर
तेज त्याच्या मागे मागे

आज जरा वाढली थंडी
धुके गेले दाट पसरून
उषा म्हणे थांबा जवळी
कामं सारे तुम्ही विसरून

साखर झोपेची आज
लाभावी पहाट धुंद
नित्यक्रम आहे रोजची
आज वेगळाची गंध

नभ कसे धुके धुके
झाडं पांढुरकी फिकी
खग उडताना भ्रम
गेले कुठे आकाश की

धरतीला पहा आज या
तलम पडद्याच्या आतून
अंग ती चोरताहे
धुक्याच्या पांघरणातून

आपणंही थांबू थोडे
रेंगाळून जाय सकाळ
कुशीतसे घेऊन मजला
चाला आकाश ढगाळ

दि.०५/०१/२०२१
सकाळी ०९.५१ वा.



## (१०)
## या अशा पावसाळी...

या अशा पावसाळी... पावसाळी...
भावनांच्या रे होड्या
मन बसून त्यातून करीतसे
पावसासंगे लाडिक खोड्या

चिंब ओले घर चिंब झाले दार
साचले पाणी तेथे तळे गारगार
अंगास भिजवून त्या पावसात
ज्या मारल्या आठवा त्या उड्या
त्या पावसाळी भावनांच्या रे होड्या

कधी कागद रंगीत ते मिळावे
कधी वर्तमान पत्र फाडून घ्यावे
किती घाई घाई बनवून नावा
शिरशिरी अंगात स्वप्नाळू थोड्या
त्या पावसाळी भावनांच्या रे होड्या

साऱ्यांनी केल्या नि सोडून दिल्या
वाहत दूर सांगा कोणाच्या गेल्या
मन गेले कोठे होड्यांसवे या
ते रम्य बाल्य खुणावी न वेड्या
त्या पावसाळी भावनांच्या रे होड्या

उगा मोठे झालो नि नियमात गेलो
स्वच्छंद जगणे हरवून आलो
ते थेंब तो गारवा तो ओलावा
मनाची तळी भावना कोरड्या या
त्या पावसाळी भावनांच्या रे होड्या

माणूसपण न कळताच होते
कळले न सारे मनुपण हरवले
या पावसाची दुरूनच  भलावण
परतून जाती सरीही  सड्या या
त्या पावसाळी भावनांच्या रे होड्या

दि.११/०२/२१
रात्री ११.४३ वा.



## (११)
## होती बहार जेव्हा

होती बहार जेव्हा
फुलले मळे कित्येक
अगणित पुष्प फळेही
लगडून ती अनेक

हे रंगरूप माझे
होते तवाणे ताजे
शृंगार हिरवाईचा
गुंजन पक्षी गाजे

ही पल्लवांची कोंबे
मृदु रेशमी तो स्पर्श
अंगास ये शहारा
वासंती हा उत्कर्ष

फांद्या त्या वाकलेल्या
पानाफुलांच्या ओझे
येती दुरून पांथ
विश्राम घेण्या येथे

टेकून बुंध्याशी या
छायेत घे विसावा
देई मी अगदी सर्वा
ही आस हा दिलासा

जाता बहार आता
मी एकलाच येथे
पानेफुलेफळे ना
गेले ते पक्षी कोठे

ना दिसती पांथ येथे
टाळून दूर जाती
दृष्टीही त्यांची विरस
आतून बोचे मजसी

होती बहार जेव्हा
गोकुळ नांदलेले
माझेच श्वास आता
आहेत कोंडलेले

तरी पाहतो स्वतःला
शिशिरातल्या क्षणी या
येईल ऋतू माधव
आतून रस ओला

माझ्या मनात फुलतो
आधी वसंत वेडा
मग अंगाखांद्यावरती
सृष्टीच्या रम्य उड्या

आतून जपणे सारे
वरवरचे गळते जे ही
जीवनरस वाहो
ते आत्मतत्त्व पाही

दि.०३/०२/२१
सकाळी ११.२१ वा.



## (१२)
## फुलून मोगरा सांगत आहे

फुलून मोगरा सांगत आहे
ऋतू आला हा आला बहरा
ग्रीष्म सुरू हा होईल आणिक
वसंत येईल गोड साजरा

गंध मोहना घेत जीवनी
तप्त उन्हाळा सुसह्य होईल
कुणी कुठे जरी ताप देतसे
हाच मोगरा धावत येईल

रेंगाळून जाईल जीव हा
मन सुगंधित शीतल होईल
अंगणातला एक मोगरा
जगण्यासाठी अविचल होईल

कळी उगवता पहिलीवहिली
वारा पुलकित होऊन वाहील
आता पुन्हा हा परिमळ वाहून
ऋतुसवे तो धन्य गं होईल

एक कळी मज कानी बोले
मी फुलण्याला आले आले
फूल झाले की देवापायी
अन गजऱ्यातून खुलून गेले

कधी ओंजळीमध्ये नुसतेच
फुलं मोगरा भरून घ्यावे
अतुल्य ऐशा सुगंध राशी
कौतुकाने मग पहात रहावे

कधी आठवणी करुनी सुरभित
जन्मभराच्या आशा व्हाव्या
कधी मोगरा शोधत जाता
गंधाळून या दिशाच याव्या

आज उगवला पुन्हा मोगरा
तनमन अंगण फुलून आले
फुल उमलता रोपट्यावरी
भाव मनीचे खुलून आले

आला प्रियवर राजस गोंडस
प्रीतीचे ते अनुनय सालस
मीच जाहले गोड मोगरी
सुगंध भरले किती निरालस

दि.०४/०३/२१
सकाळी ११.३७ वा.




## (१३)
## होशील का रे सखया

इतुका हळवा आणि गुलाबी
होशील का रे सखया
याच फुलांच्या सवे स्वभावा
तलमशील का सखया

अशा पाकळ्या तव हृदयीच्या
खुलूनिया येऊ दे
बिंब मला ते नाजुकसे रे
आत तुझ्या पाहू दे

प्रीत परागा उमलू दे ना
मीलन होईल ऐसे
नको राग अन नको दुरावा
सुमन मन हे ऐसे

अशी येऊ दे झुळूक सुखाची
आनंदाने डोलू
मूकपणाने भाव मनीचे
कळी पाकळी बोलू

रंग न बदलो तुझा कधीही
मजला तू सांभाळ
अंतःकरणी निज प्रेमाचा
करीशी रे प्रतिपाळ

असू नसू दे बहर कधीही
तू बहराला यावा
कवेत या तव अनुरागाच्या
धुंद वसंता घ्यावा

प्रकाश मिळू दे ,मिळू दे पवन
मधुर चालू दे गुंजन
हळुवार या तुझ्या नादी मी
मदनाला अभिवंदन

शिशिर आला तरी भाव न गळू दे
जागा उमलते पुन्हा
तुला वाटतो तर मी करते
प्रेमाचा हा गुन्हा

काही नको मज, फूल तू व्हावे
नाजूक भावफुलोरा
जाणून मजला घेशील वेड्या
प्रतिसादाचा दुजोरा

दि.१४/०३/२१
सकाळी०८.०६ वा.




## (१४)
## बहरून आला बहावा

असा निघळला स्वर्गामधला
कुबेर खजाना पहावा
मोजीत असता धरी कोसळला
बहरून आला बहावा

लखलख सोने पुष्प जाहले
स्वर्णभूषण नाव
जानकीस प्रिय कर्णी घालण्या
कर्णिकार घे ठाव

अलंकारांनी मढलेला कुणी
राजा लोभसवाणा
राजवृक्ष म्हणे कुणी आरेवत
शरीरा ठेवी देखणा

आरग्वध, शम्पाक, व्याधीघात
रोगा शमवून जाई
चतुरंगुल, कृतमाल, सुवर्णक
दीर्घफल, नाम घेई

स्वर्णभूषण अन स्वर्णांग
कांचन अंगी पसरते
जणू उषेचे पिवळे दूकुल
अडकून यावर झरते

ती शिवानी साजामध्ये
तुलाच मढवून घेते
आणि शिवाच्या हृदयामध्ये
अलगद गढून जाते

अमलताश तू आण वसंता
उष्मा होई सुसह्य
फुले पाहुनी मृदुल रेशमी
प्रीतभावना असह्य

हळद माखली अंगोपांगी
लाजे वधू बावरी
अन लज्जेचे वसन पीत हे
पिवळ्या हाती सावरी

असा बहावा गाली फिरावा
शहारून येईल अंग
लाडिक लज्जा चरमसीमेला
लेईल सुवर्ण रंग

दि.२८/०४/२१
दुपारी ०५.११ वा.



## (१५)
## त्या धुक्यातील त्या क्षणांना

त्या धुक्यातील त्या क्षणांना
अविरत मन आठवते
त्या झंकारांच्या गावाला
जगण्या पुन्हा पाठवते

तू तिथे मी तिथे
ती जवळीकता होती
नवीनवी स्पर्शाची
आगळीकता होती

लाजेच्या पडद्याला
साथ धुक्याची मिळाली
मिटता लोचने स्वप्नामधली
आस क्षणात कळाली

हातामध्ये धरता हात तू
शहारले अंगांग
फुलफुलावर उमटून झाले
कोमलतेचे दवांग

कधी वाटते अशा दवाने
प्रिया जवळ आणिले
रात धुक्याची पहाट धुकेरी
धुक्या तुला मानीले
प्रियतमासी तू जवळी आणिले...

दि.०५/१२/२०२३
संध्याकाळी ०६.२८ वा.



## (१६)
## शिकवण वैशाखाची

येतो वैशाख वैशाख
ल्येत आगीचा पोशाख
त्याचा नाच चाले खास
अंगा काहिली वनवास

चंद्र पौर्णिमेला येतो
विशाखाच्या आसपास
बहरत्या मोगरीचा
दरवळतो सुवास

सूर्य वृषभ राशीत
आग ओकतो भरात
नवं धान्य भरलेल्या
गोण्या येतील दारात

लग्नसराईची घाई
एकरूप दोन जीव
अशा काहिलीत मग
मनी वसंत सजीव

कुठे गुलमोहराला
येतो बहार बहार
रुक्ष कोरड्या हवेत
गंध अत्तरी फवार

पाणी माठातलं प्यावं
त्यात वाळ्याचा सुवास
थंड पडदे घराला
उष्म्याच्या या उतारास

सरबतं पन्हे पेये
सरसर उदरात
आमराईतला आंबा
चाले रसाळी घरात

शिकवण वैशाखाची
सोस झळा दिसमास
दुःख तापलेलं आधी
मग सुखाचा प्रवास

दि.२१/०५/२१
सकाळी ०९.४७ वा.



## (१७)
## थेंबकळ्या पावसाच्या बहरल्या मनात

थेंबकळ्या पावसाच्या
बहरल्या मनात
शिरशिरीत प्रीतस्पर्श
उमले या तनात

ओलेतीचे अंग माझे
मिठी रेशमी
थेंब मोती माळलेले
किती केशी मी

ऋतू असतो कधी नसतो
मेघ बरसती
भेट अशी तुझी माझी
स्वप्ने हरखती

अधरांवर चमचमती
थेंब दवाचे
प्राशिले तू दुरून त्यांस
लाजले असे

भेट अशी पावसाळी
मने चिंब रे
थेंब कळ्या पावसाच्या
दोघे गुंग रे

अजूनही मज मृदगंध
मोहवी तुला
श्वास परिमळूनीया
श्वासी माळला

एकटी मी ढग जमले
दामिनी दमात
थेंबकळ्या पावसाच्या
बहरल्या मनात

दि.०२/०६/२१
रात्री १२.३७ वा.



## (१८)
## त्याचा चैतन्याचा चाळा

खुणा पावसाच्या अशा
थोड्या ओलीतीच्या बघा
दव थांबती पातीशी
स्नेह ओलावा जपता

माना टाकलेली रोपं
गवताच्या काड्या झाल्या
एक जाळता ऋतू हा
नंगानाच करू गेला

झालं गेलं संपलं की
आता काही ना उरलं
तेवढ्यात पावसानं
सारं आभाळ भरलं

आल्या सरीवर सरी
लगबग भरभरी
जीव गेलेल्या जगात
नवजीवनाची झारी

असा उनाड ऋतू हा
त्याचं नाव पावसाळा
देतो संजीवनी पहा
त्याचा चैतन्याचा चाळा

दि.१५/०६/२१
सकाळी ०८.०७ वा.



## (१९)
## सात रंगांची रंगाळी

माझ्या रानाला सांधतं
उंच मोकळ्या आभाळी
असं धनुष इंदरी
सात रंगांची रंगाळी

त्याला मोहात पाडतं
माझं समदं हिरवं रान
किती रमलंया हितं
इसरून सारं भान

डोंगराच्या अंगावर
उपरण रंगारंग
अभिषेक त्यो होतोया
सर्गातली गंगा दंग

जवा वरुण राजाला
धीर धरवत न्हाई
सुर्व्या किरणांना त्याच्या
संग खेळवत न्हाई

इंदर राजा सर्गाचा
त्याची लगबग झाली
सरी सोडताना खाली
धनुषाची ओळ आली

नेम लागला लागला
थेंब बाण सरसर
ओली धरणी ही झाली
पेरा घ्यावा भरभर

दि.१७/०६/२१
सायं ०६.१३ वा.



## (२०)
## पावसाळी ही पहाट

चिंब पावसाची वाट
धुंद प्रभातीचा थाट
सांज भास झाकोळले
थेंब सारे विसावले

कोसळून थकले का
नाही खेळले खेळले
थेंब वाट्टेल तसे ते
मुक्तपणे बागडले

वाट जशी ओली झाली
स्वप्ने जागेपणी आली
गंध अत्तरे लेऊन
दरवळा जाग आली

बीज पहुडले होते
प्रीत पांघरून मनी
अलगद अंकुरले
सरी येताच अंगणी

थोडी शिरशिरी येई
अंग चोरते ना भुई
परी गीत मनातले
तिचे रोमरोम गाई

पावसाळी ही पहाट
झोप साखरेची येई
सखी उठविण्या येता
निज गुलाबीच होई

दि.२२/०६/२१
सकाळी ०८.३३ वा.



## (२१)
## पान पान लाजाळू रे

पान जाळीदार जाळी
तुझी आठवण आली
उमलून येतं तेव्हा
तुझी माझी भेट झाली

अंगणात ऋतू नाचे
हिरवा श्रृंगार हा साजे
पानोपानी वसंताची
आस आसुसली लागे

एक एक पान पाही
माझी तुझ्यासाठी ओढ
किती पाहते मी वाट
हट्ट आता तरी सोड

आली भरून झाडाशी
सारी सारी ही पल्लवी
लवलवणारी पाती
हुळहुळणारी नाती

पान पान लाजाळू रे
माझ्या शरीरी उमले
तुझ्या आठवांनी बघ
कसे अंग चोरणारे

पानोपानी लिहू राजा
लेख मदनाचे प्यारे
रती मनी वसताना
ऋतू मोहविती सारे

दि.२३/०६ /२१
सकाळी ०८.०५ वा.



## (२२)
## अन् हा ऋतू मोहरला

आलीस अशी किती सहजी तू
सुख उधळीत नजरेमधुनी
मी तसाच आहे तिथे थांबलो
बुडलो नयनी अजुनी

किती पुस्तके खुली करावी
तशी तू वदली काही
किती वाचले मीही ग्रंथ
तुजविण स्मरतच नाही

अशी हासली गेली उधळून
फुले लक्ष उमलुनी
माहीत नाही अशी अवेळी
कशी फुलली कमलिनी

तुझे पापण्या अलगद उघडून
तशाच मिटवून घेणे
किती भाव ते शब्देविणही
नजरेतून बोलणे

साक्षी होऊन माझ्या मनी हा
मधूमास बहरला
प्रीत फुलोरा पाहून लाडिक
अन् हा ऋतू मोहरला

दि.२४/०६/२१
सकाळी १०.२१ वा.



## (२३)
## सर थेंब मोतीयाची

थेंब ओघळून आले
जरा विसावण्या इथं
झडलेली पालवी न
झाड ओसाड वाकलं

त्याचं दुःख कुणा कळे
पानगळल्या जखमा
तनु शृंगारली कधी
आता उरलेल्या खुणा

आल्या सवयीनं सरी
खुली झाडाची ओसरी
जरा भकास उदास
त्याच्या पानोपानी चरी

मग रूप मोतीयचे
थेंब थेंब पांघरून
झाड लगडून गेले
थेंब थांबून रमून

एक इटुकले पान
ऋतू मागचा लेऊन
नव्या चांदण्यांच्या नभी
गेले चिंब ओलावून

सर पाण्याची पाण्याची
सर थेंब मोतीयाची
सरसर सुख आले
बरसात चांदण्यांची

दि.२५/०६/२१
रात्री १०.४९ वा.



## (२४)
## मन पाऊस पांघरी

कळी भिजली भिजली
मनी उमलून आली
अंगावर दवबिंदू
माळ मोतीयाची झाली

ऋतू भिजण्याचा आला
गंध मातीचा सुटला
निजलेल्या बिजागरा
कवळा अंकुर फुटला

गर्भार वसुमती
सस्य तिची हो संतती
तरारून उगवती
साऱ्या धान्याच्या प्रजाती

मळे फुलांचे फुलती
फळबागा हो डोलती
घरादाराच्या छताशी
थेंब सूरही धरती

पानोपानी गुज ओले
ओली पाकळी पाकळी
धुंद वाहतो शरीरी
वारा अत्तरांच्या कुपी

असे लावण्य हे चिंब
खट्याळाच्या प्रीतसरी
तनू भिजली मनीही
मन पाऊस पांघरी

दि.३०/४ / २१
सकाळी ०७.५४ वा.



## (२५)
## फिटे पारणे दो नयनांचे

दवबिंदूंची माळ साजिरी
सृष्टीराणीच्या कंठी
नक्षीदार किती कुसर रेखिली
जडवणूक हिरेबंदी

नाही ओवला धागा कुठला
कुठून सांधले मोती
चमचम लुकलूक तेज पाजळे
क्षणात नभ ये हाती

रत्नहार जडविला सुरेखी
कारागिरी देखणी
असा दागिना घटकाभरी हा
पाहून घ्या लोचनी

फिटे पारणे दो नयनांचे
कर्त्याची स्वाक्षरी
रत्नपारखी कोण कोठला
अजब घडली ही सरी

वर्षा ऋतूच्या खुणा बोलक्या
लावण्याच्या ओळी
असा सोहळा टिपून घ्यावा
भाग्य उजळता भाळी

दि.०९ /०७/२१
सकाळी ०७.५३ वा.




## (२६)
## थेंबराण्या पावसाच्या

चिंब पावसाच्या घरी
सारं ओलं ओलित्याचं
वर आवाज गगनी
चाले दळण जात्याचं

पात्या घरघर नभी
घासघासुनी फिरती
वीजबाई हो तोऱ्यात
अशी मधे चमकती

सरी दळण पडतं
शुभ्र पाणी ते सांडतं
आता बुजलेलं बीज
खेळ उगवी मांडतं

कोण म्हातारी काळाची
धनधान्य सर्गाची
सोडी गठडी पाण्याची
झुंज काळेत्या ढगांची

घ्याना भरून भरून
गोण्या गारा पावसाच्या
आत मनात साठवा
थेंबराण्या पावसाच्या

दि.१३/०७/२१
दुपारी ०४.१७ वा.



## (२७)
## पुन्हा गुंतलो थेंबांमधुनी

त्या पाऊस धारा वेचून गारा
रमलो मी जेथे
घर ते माझे अंगण वेडे
भिजते अजूनही येथे

ढग पिंजारले वर आभाळी
छटा पसरली काळी
एक अनामिक ओढ खेचुनी
नेतसे मजला निराळी

उनाड वारा श्रावण सारा
ओंजळीत भरताना
पिऊन थेंब मी घेऊन गारा
एकमेका मारताना

खाऊन गारा सवंगड्यांची
मस्तीत धमाल चाले
त्यावेळी मज थेंब थेंबही
गुज कानातून बोले

आज किरकिरा झालो मी तर
कशास पाऊस आला
कामावर मी जाण्यासाठी
होऊन गेलो ओला

विसरून गेलो बालपणीचे
ऋतू अंगावर झेलून
जीव इवलुसा परी आनंदा
डोंगराएवढे पेलून

पुन्हा गुंतलो थेंबांमधुनी
धारा मनी कोसळल्या
गावाकडचा घर ओलावा
गंधकळ्या उमलल्या

दि.२२/०७/२१
सकाळी ०८.१३ वा.




## (२८)
## हिरवी गाणी हिरव्या ऋतूची

झुलती झाडावरील झोके
सरोवराचे चुकतील ठोके
परी गोजिरी अधांतरी अन
रम्य चालती ते हिंदोळे

मत्स्य राणुल्या होती गोळा
रंगीबेरंगी चंचल चाळा
तिच्यासवे ते बोलून घेण्या
आटापिटा बघ त्यांचा सगळा

वरून वाकल्या फांद्या कणखर
पालवी नाजूक हिरवी सुंदर
अंगावरती झोम्बु देती
जिवास झुलवीत अंबरी झुंबर

तिकडून आली लाट धुक्याची
शिरशिर शिरवे गगनावरती
हिरव्या गगनी सरोवराची
हिरवी गाणी हिरव्या ऋतूची

पाऊसधारा श्रावण प्यारा
मनास देई सदा दिलासा
कुठेतरी मन रमून जाते
कधी लाभता असा किनारा

दि.२७/०७/२१
रात्री ११.४१ वा.



## (२९)
## हे चक्र ऋतूंचे ऐसे

हे चक्र ऋतूंचे ऐसे
परमेशाने निर्मियले
गर्वात बुडाल्या वसंता
शिशिराने भानी आणले

फळा पाना फुलांचा जेव्हा
बहर उतू हा गेला
फुंकर मारूनी त्यावर
वृक्षास निष्पर्ण केला

सालंकृत श्रीदेहाची
निरलंकृत काष्ठे होता
संयम खोडांतरीचा
झाडाला तगवीता

काळाचे बलशाली मग
चक्र फिरुनी येते
मृतप्राय लाकूड येथे
नाजूक पल्लव ल्येते

तो गर्भरेशमी शेला
अंगावर असा का आला
संपताही सारे सारे
आतून जीवनरस ओला

विरहिणी कशी जगते ना
शब्दात मांडणे नाही
देहावरच्या लेण्यांना
मरणयातना काही

पण येईल राजस माझा
आतुरतेने भेटाया
मीलनक्षण एक पुरेसा
उत्कंठा शिगा गाठाया

निःशब्द तपांच्या पोटी
शब्दसुमन रामायण
वेदना माय होऊनी
प्रकटती वेद ज्ञानायन

अभिशाप मानता याला
की वरदानाची भूमी
नास्ति नास्तिच्या घोषे
अस्तित्व जाणिले हो मी

दि.२८/६/१९
सकाळी ८.१६ वा



## (३०)
## कशी सावरू आभाळा

पावसाळी वाट ओली
तिच्या अंगावर काटा
चिंबावली गंध ल्याली
उरी सृजनाच्या लाटा

आज संगे तिच्या वाहे
एक झुळूक वाऱ्याची
हळुवार फुंकरही
जखमांना गारव्याची

आज तिची तीच बोले
अशी एकटीच चाले
ऋतू ओघळून आला
तिच्या गालावर रुळे

पहुडली ती निवांत
क्षण मनी साठवून
थोडी लाजून मुरडे
ऋतू सखा आठवून

किती पोळविल्या राती
दिन उन्हाने जाळले
तरी स्वप्नं पावसाळी
तिनी उरात पाळले

मंद सांजवेळी झाला
कुंद प्रकाश गाभुळा
निशा रंगात येईल
कशी सावरू आभाळा

दि.१८/०८/२१
सकाळी १०.३१ वा.



## (३१)
## ओलावा तिथे खास

होऊन ऋतू जाईन
परदेशी थोडे राहीन
ते स्वच्छ रस्ते आणि
घरे चकचकीत पाहीन

पाऊस होत बरसून
पाहीन थोडे थोडे
पाण्यास मुरण्याला मग
जागा कुठे हे कोडे

नुसतेच सडकेवरूनी
धावत सुटणे होईल
वाहण्यास सोबतीला
कोणीच नाही येईल

ना पाचोळा ना धूळ
ना कोणतीच भूल
ना पडले तुकडे कागद
कचराही शिस्त पाळत

घरे देखणी सधन ती
परि माया तेथ नाही
मज देशी झोपडीत
गळण्यास जागा काही

सहजी मी आत जातो
त्या फाटक्या घरात
काढीत दृष्ट माझी
उभी माय उंबऱ्यात

रस्त्यावरून मजला
जाण्यास किती बंध
अडवून किती जाती
म्हणती मला ते थांब

पाऊस मी हसूनी
निसटून जाण्या शर्थ
मज भारतात आहे
जाण्यास माझ्या अर्थ

येथे किती पडावे
परदेशी तडफडावे
चकचक प्रदेश सारे
मन कोरडेच रहावे

ही जर असे सुंदरी
नटलेली रम्य नगरी
तर मजसी गावखेडं
वाडीच माझी प्यारी

घरदार परस अंगण
ओलावुनी मी वाहीन
काळ्या आईच्या पोटात
जन्मास पुन्हा येईन

अंकुर फुटेल मजला
पाऊस झाड होईल
वाढून ढगास अडवून
बरसात पुन्हा देईल

ते प्रेम काळजी ती
माईच्या काळजात
पडला जरी न पाऊस
ओलावा तिथे खास

इथे कोसळून रडतो
पाऊस स्वतःच वेडा
नाती इथे फुकाची
कोरडाच प्रीत घडा

दि.०७/१२/२१
रात्री ०८.१५ वा.



## (३२)
## झाड मानवी सुकू न द्यावे

गळली पाने शिशिर सांडला
दुर्दैवाचा खेळ मांडला
अन्य तरुंवर कृपा सृष्टीची
पानांविन मज श्वास कोंडला

कोसत बसलो रोज मला मी
शिशिर कुठून हा आला वैरी
हरित संपदा लुप्त जाहली
कट्याकुट्यांची कुडी राहिली

नाही पक्षी कुणी विसावत
कुणी साधे मज नाही पाहत
सुकल्या संपून गेल्या संपदा
आहे कफल्लक वृक्ष आज हा

ती किलबिल ते कूजन रम्य
त्या फांद्या फुले पाने सुरम्य
ते माझे बहराचे सुदिन हो
वसंतातले मोहक अंगण

आले अचानक ढग पिंजारून
शुभ्र कापशी शाल पांघरून
निळ्या आभाळी मेघ मालिका
शुष्क झाड बघ आले तरारून

झाले झाड किती सुंदर सुंदर
दुःख क्षणातच हो छु ..मंतर
असे अचानक सुख ये धावून
कशास कोसणे मनास आतून

सुकल्या झाडावरी  नभातून
रजत ऋतुची झाली पखरण
झाड मानवी सुकू न द्यावे
अशा सुखाचे गाणे गावे

दि.१०/१२/२१
दुपारी १२.११ वा.




## (३३)
## प्रेम रंगते वरपांगी ना

रंग केशरी झाडावरती
पाने होऊन सजला
तरूतळीच्या तळ्यात किंचित
अलगदसा तो भिजला

नटला सवरला मोद मोदला
दर्पणी पाहण्या आतुर
नितळ जळातीळ प्रतिबिंबाचा
गवसला त्याला सूर

त्यात पाहुनी रंग मोहूनी
केसर रोमांचित
कधी पानुल्या लाज लाजुल्या
प्रियतम उमटे अवचित

ऋतू प्रियवरा बिलगून जाशी
तुझ्या प्रेयसीला तू
वसंत फुलतो मना भुलवितो
कोकीळ कूजन कुहू कुहू

असे सोहळे प्रीतभारले
सृष्टीच्या अंगावर
प्रेम रंगते वरपांगी ना
अंतरंग रंगावर

दि.१२/१२/२१
सकाळी १०.२६ वा.




## (३४)
## मन रेशमाचं झालं

हिरवळीच्या कुशीत डोंगराला निज आली
वर आभाळानं माया मेघभर पांघरली

रंग हिरवा सावळा अंग धुक्यात बुडालं
रखरख डोंगराचं मन रेशमाचं झालं

वाट पहुडली होती उगा निवांत निवांत
तिला थंडी भरल्याने झाली निर्जन शांत

तिच्या काठी गवताची एक शाल पांघरली
साऱ्या सृष्टीतून थंड पावसाची लहराली

मन माणसाचं झालं झालं गडद हिरवं
त्याच्या काळजात ढग ओलाव्यानं भरलेलं

विसावा हा शोधताना एक दिलासा लाभतो
ऋतू वेगवेगळाले ऋतुगंध हा वाहतो

दि.१६/०१/२२
सकाळी ११.२२ वा.




## (३५)
## मन गुलाबाचे

गुलाब फुलला
ऋतू राणी मोहरली
गंधाने बहरली
लाजली

स्पर्श रेशमी
संदेशाची सुंदर खणी
उमलतो मनी
राजगुलाब

मुक्या भावना
वाच प्रियेचे
मन गुलाबाचे
मोहक

कधी बोचतील
काटे मत्त परी
गुलाब हृदयांतरी
उमलतील

जगणे माझे
धुंद गुलाबी निशा
सुरभिल्या दिशा
गुलाबाच्या

दि.०१/०२/२०२२
१२.४१ वा.




## (३६)
## पदतळी माझ्या सडा फुलांचा

असा फुलू दे वसंत जीवनी
रंग भरा येऊ दे
पदतळी माझ्या सडा फुलांचा
रेशीम तलम उमलू दे

स्पर्श कोवळे किती मल्मली
मन माझे बहरू दे
तुझ्यासवे ही सृष्टी सारी
मुक्तपणे विहरु दे

साथ असावी अशी बोलकी
शब्द नको मोजूनी
बघ डवरून जे आले फुलोरे
मोहून नेती अजुनी

हात असावा हाती माझ्या
जन्मोजन्मीची वचने
या फुलांच्या आणि ऋतूच्या
स्मृतिफुला वेचणे

माझ्या डोळ्यांमध्ये फुलावे
स्वप्न असे वेगळे
तू मी मी तू असू सोबती
क्षण सुंदर आगळे

सहज विसावे मन हे माझे
इथे तुझ्या संगती
उभा तरू हा ऋतुराणीच्या
खुणा ल्येत अंगती

किती कोवळे तलम भाव हे
मन माझे गहिवरे
गळत अश्रू मग आनंदाने
होत मोती सावरे

अशा क्षणांवर आयुष्याने
स्वतःस झोकून द्यावे
हळुवार या फुला पाकळ्या
मनी साठवून घ्यावे

दि.१९/०२/२०२२
सकाळी ०९.३७ वा.




## (३७)
## वसंत गाली हसला

फुले सदा ही रंगीत सुंदर
पाने तशीच झाली
बगीच्यामध्ये ऋतुराणीच्या
बहरा वर्दी आली

रंग केशरी पानोपानी
असा सजुनिया बसला
रंग गुलाबी लेऊन पाने
वसंत गाली हसला

हिरवी पिवळी गर्द जांभळी
रंग होळी जणू चाले
सृष्टीमध्ये पिचकारीने
श्रीरंगचि हा खेळे

पदतळी सांडे सडा मखमली
प्रीत फुलुनिया आली
भावफुलांची मनात सारी
गर्दी अवचित झाली

असे वाटते सुख मज पायी
राजसा तू अंथरावे
प्रीतीचे हे धाम कधी ना
जन्मोजन्मीही सरावे

इथल्या आठवणींनी फुलुनी
यावे वेळी यावेळी
साद मनाची ऐकून धावे
राधेसाठी श्रीहरी

दि.०१/०३/२०२२
सकाळी ०५.५७ वा.



## (३८)
## मृद्गंध मोहवी मना

मृद्गंध दरवळे जेव्हा
मज ओढ वेगळी वाटे
का उगाच मातीसंगे
जडे एक अनामिक नाते

ते थेंब मृगाचे पडता
अत्तर कुपी मृण्मयी उघडे
तो दिव्य सुगंध पसरता
वाजती  सुरभी चौघडे

मृद्गंध मोहवी मना
मन धुंद होऊनी जाते
ओलावा प्रीतीने भरला
ते गीत तयाचे गाते

स्मृती मनी दाटुनी
मज मनी पावसाळा ये
त्या तुझ्या नि माझ्या भेटी
पावसास चाळा लागे

मृद्गंध खूण परिमळते
मी क्षणात हरवून जाते
ते वातावरण प्रफुल्लित
मृद्गंधी मी हरखून जाते

मृद्गंध जणू सुरुवात
नव नात्यांची रुजवात
मृद्गंध हुंगताना तो
ऋतू गाभूळलेला आत

दि.२८/०५/२०२२
सकाळी ०८.४९ वा



## (३९)
## अजूनही मी

अजूनही ऋतू बहरून फुलतो
तुझ्या येण्याची वाट पाहात
ग्रीष्मातही...

अजूनही वारा गंध पेरतो
तुझ्याचसाठी बेभान होतसा
शिशीरातही.

अजूनही झरती झरझर धारा
देत गारवा सुखावणारा
हेमंतीही...

अजूनही येतो शिरशिर शिरवा
थंडीमधला स्पर्श कोवळा
वसंतातही...

अजूनही राती नक्षत्रांच्या
तोच चांदवा पसरून देता
वर्षाऋतूतही...

अजूनही ना गळते पालवी
मनास माझ्या अवचित झुलवी
शरदऋतूतही...

अजूनही मी तसाच राणी
वाट पाहतो डोळा पाणी
क्षणोक्षणी...

दि.१७/०४/२०२२
रात्री ०८.४३ वा.



## (४०)
## पावसाळी माझा छंद

धुकं पावसाळी हवा
सहवास तुझा नवा
रम्य भिजट ही वाट
गंध मातीचा हुंगावा

पान पान शहारलं
झाड झाड तरारलं
नवं चैतन्य भरून
जणु रान उभारलं

वाट धुक्यात चालते
मी माझ्याशीच बोलते
तुझे आठवून चाळे
मनी उगा मी लाजते

तुझा माझा पावसाळा
ऋतू आवडीचा झाला
सांग कुठूनसा राजा
गंध कस्तुरीचा आला

मेघ हट्टाला पेटले
नभ भुईला टेकले
थेंब थेंब बरसून
माझे क्षण क्षण ओले

ओलेतीत प्रिया धुंद
गुज ऐकू येई मंद
तुला रिझविण्याचाच
पावसाळी माझा छंद

दि.१९/०६/२०२२
सकाळी ०६.५८ वा.




## (४१)
## गूज आपुले पाऊस होणे

ओल्या चिंब तुझ्या हाका त्या
मनास माझ्या करिती चिंब
तू भिजलेली निथळ चांदणी
हृदयी प्रीतीचे फुलले बिंब

केशकुंतले थेंब झाडीती
कंकण ओले राग छेडीती
कर्णफुले ओथंबून लोलक
मोत्यांची बरसातही करिती

वस्त्रावरती नदी उतावीळ
जणू सागरासाठी वहाते
मेघांचे ते दान घेऊनी
वर्षाराणी भुईवर येते

त्या अधरांवर थेंब दवाचे
मनास माझ्या उलथून देती
किती राखिले मर्यादेने
सीमा उल्लंघून ते जाती

अशा पावसाळ्यातील सखये
तुझे मुक्त ते भिजून नाचणे
ओल्या ओल्या प्राजक्ताच्या
गंधाला श्वासातून वेचणे

तुझ्या ओलसर घट्ट मिठीतून
कधी न मी बघ विलग हा व्हावा
तुझ्याच सोबत पाऊस वेडा
वेडा हा तव प्रियकर व्हावा

चार मास भारावून जाणे
पावसातले ओले गाणे
तू मी दोघे आणिक पाऊस
गूज आपुले पाऊस होणे

दि.०६/०७/२०२२
सकाळी १०.४४ वा.



## (४२)
## म्हणूनही मी बरसून जातो

कित्ती काहीबाही साचलंय
बघ त्या मेघाच्या मनात
शुभ्र धवलसं रूप गोजिरं
काळंभोर झालंय क्षणात

दडपून ठेवत त्यानेही
केलाय खूप दूरवरचा प्रवास
दुःख बरसलं तरी कामना
मृण्मयी येऊ दे ना सुवास

ज्या धारा बघ उरात दडल्या
बळ कधी तर शल्य कधी
कोसळणे कधी कुणा नकोसे
कधी बरसणे साफल्य

कधी वेदना होत गर्जना
टाहो फोडून रडतो मी
कधी प्रियेच्या केशकुंतली
थेंबकळ्याही पाडतो मी

कधी आषाढी वारीमध्ये
वारकऱ्या पायी पडतो
कधी वळवाचा होत सडाका
ग्रीष्माला मी सुखावतो

कधी कारण तर विनाकारण ही
बरसण्यास मी तरसून जातो
कधी मनाला माझ्या वाटले
म्हणूनही मी बरसून जातो

दि.०८/०७/२०२२
दुपारी ०१.५८ वा.



कधी मेघ तव शुभ्र पांढरे
कधी काळे घनघोर
कधी मनातही येतो भरुनी
नभा तू भावविभोर

ऋतू असताना येणे समजते
नसता नंगानाच
वेळी अवेळी भरून गर्जन
त्रास रे सर्वांनाच

तुझ्या मनातही काही साठले
आहे का रे दुःख
म्हणून गाळीशी टपोर आसवे
हलके करीशी दुःख

ये रे ये रे भरून कधीही
अधूनमधून तू  राजा
मूक गाळ तू तुझ्या वेदना
नको रे गाजावाजा

ऐक एवढे बोल मैत्रीचे
नितळ राहुनी हस तू
कधी पूर्णता कधी रिक्तता
कधी एकटा बस तू

दि.२२/०७/२०२२
सकाळी ०९.२२ वा.

## (४३)
## ऐक एवढे बोल मैत्रीचे

कधी वाटते आभाळाला
हळूच कानी पुसावे
का वाटते तुला भरावे
घनगंभीर दिसावे

कधी तुझे भरणे वेड्या
जिवास लागे हुरहुर
कधी माजवून देतोस रे तू
उरात धडधड काहूर

सागर वाफा कवटाळून तू
थेंब थेंब भरतोस
आणि भुईवर पोषण होऊन
कणी कणी उरतोस



## (४४)
## दोन धुक्यांनी...

पावसाळ्यातल्या धुक्यानं
काचा सगळ्या वेढल्या ना
खिडकी स्वच्छ नितळ होती
दृष्टी धूसर घेरल्या ना

तुझ्या आठवांना तर
ऊत येतो अशातच
धुक्यातही भूतकाळ
स्पष्ट होतो अशातच

काच बाहेरची पुसता पुसता
आतून एक धुकं येतं
डोळ्यावाटे आभाळ होत
लोंढा वाहत मुकं होतं

उपनेत्राची काच मला
वारंवार पुसावी लागते
काहीच घडलं नाहीय आत
मी निर्विकार दिसावी लागते

तेव्हा बाहेरचं धुकं मग
आतल्या धुक्याला सावरतं
आतल्याचं दुःख पाहून
तेही वेडं बावरतं

आपल्याच धुंदीत होतं ना ते
एवढा वेळ ऐटीमध्ये
हरवलं म्हणे बाहेरचं धुकं
दिसेचना दिवटीमध्ये

आतल्या धुक्याचे हुंदके जरा
आता त्याला कळू आले
इतरांना पुसट करणे किती सोपे
स्वतः होताना रडू आले

पुन्हा माझ्या चष्म्यावर
त्याच्या आतून आभाळ झरलं
दोन धुक्यांनी दुःख माझं
पेलवत पेलवत हाती धरलं

दोन धुक्यांनी दुःख माझं
पेलवत पेलवत हाती धरलं

दि.२५/०७/२०२२
सकाळी ०७.४३ वा.




(४५)

## मिठीत विरघळल्या तू पावसा

असे पाहशी उंच नभाला
जसा चातक मेघाला
कौतुक भरले डोळ्यामध्ये
ओढ प्रिया भेटीला

बघून आले भरून काळे
आभाळ हे पावसाळी
तुझ्या मनाचा मोर नाचतो
पिंगा राजसा घाली

आसमंत मदमस्त जाहला
बदलून गेले वारे
मनोभाव ते पुरवील राजस
कवेत घेऊनी सारे

वर्षाराणी धुंद नाचली
बागडली धरणीवर
मनात आधी ती हुंदडती
मग पडली धरणीवर

भिजून जातील गात्र पिपासित
जळा खळाळून जा
मिठीत विरघळल्या तू पावसा
जरा रेंगाळून पहा

दि.०६/०८/ २०२२
सकाळी ०६.४३ वा.



## (४६)
## नेहमीच राहतील बहर ऋतूंचे

अशी फळे ही लगडून येतील
त्यासाठी हवी किती साधना
त्या इवल्याशा बीजासाठी
सहज सोपी असते का गाढना

नुसते गढून घेणे नसते
स्वत्व विसरुनी रूपांतरणे
सारे स्वतःचे द्यावे सोडून
तेंव्हा कोंबाने वर तरारणे

ते तरी असते का हो सोपे
जीव इवलुसा अनंत धोके
कधी उधळुनी येती संकटे
कधी हवेचे अलगद झोके

तरीही वाढणे वाढत जाणे
आत अंतरी आस जगविणे
सोस सोसूनी उन्हाचे चटके
खात वादळी तडाखे फटके

आपुल्या मुळांशी घट्ट जोडुनी
नाते दृढतम असे सांभाळून
ऋतू सहाही अंगी झेलून
बहार येते फळे फळाळून

तेव्हा तर मग नकोच गर्व
झुकून वाकून घालवी पर्व
पुन्हा शिशिरा हाती जाणे
गळून सुकून वसंत पहाणे

फळे सुखाची येतील जातील
सुखासुखी ती घ्यावी चाखून
अन गळतीचे दुःखही जाईल
थोडी जागा त्यालाही राखून

सुंदर जगणे झाडफुलांचे
ऋतू सृष्टीचे आणि फळांचे
कोणीच नाही हट्टा पेटत
नेहमीच राहतील बहर ऋतूंचे

दि.०९/०९/२०२२
रात्री ०९.५४ वा.



## (४७)
## शरदाच्या चांदण्यात

शरदाच्या चांदण्यात
तुझे माझे एक बिंब
तिथे सुधाकर होई
प्रीत अमृताने चिंब

शरदाच्या चांदण्यात
तुझ्या बाहुमध्ये जुई
माझे स्पर्श चांदण्याचे
लज्जा मृदु छुईमुई

शरदाच्या चांदण्यात
माझी लावण्य माधुरी
खुललेली निशा सवे
होय कामनाही पुरी

शरदाच्या चांदण्यात
चांदण्यांची चमचम
लक्ष्मी नुपूरांचा नाद
गुंजे कानी छमछम

शरदाच्या चांदण्यात
घट्ट विणलेली नाती
सौख्य देते तुला राजा
जप काळजाची पाती

दि.०१/१०/२०२२
सकाळी ०७.३८ वा.



## (४८)
## चांदणं

चांदणं
शरदात हसणारं
भूल भूल भुलवणारं
मस्त धुंदीत मनास खुलवणारं

चांदणं
कोणासाठी पडलेलं?
प्रत्येकाच्या उधाण अंतर्मना
प्रीतीच्या फेसाळणाऱ्या चंचल भावना

चांदणं
त्याची मक्तेदारी
शुभ्र हास्याची उधळण
रात्रीला आठवांना देणारी उजळण

चांदणं
विरहाचा जाळ
रूपानं आल्हादी नितळ
जाळणारं सांगा कसं शीतळ?

चांदणं
मनाचा दिलासाही
प्रिय प्रियतम वाटणारं
सखा म्हणून नित्यनेमानं भेटणारं

शिरोमणी काव्य
दि.११/१०/२०२२
सकाळी ०८.१३ वा.



## (४९)
## जरा रुजवावे स्वत:ला

डोंगर पायथ्याशी असा, हिरवाईचा सडा अंथरला
ऋतू वर्षावाचा आला, कणकण इथला मंतरला

उभी झाडे दिमाखाने, दवांच्या माळा लेवूनी
फुलांनी झटकीले स्वतः, शहारे अंगी येऊनी

स्वतःला झोकुनी देती, धबधबे जोमत्या चाली
दुधाच्या रेघा ओघळती, क्षीरगंगेतुनी खाली

सारे सीरेच बोलतात, आपुली भाषा निराळी जी
शब्देविण चालती संवादे , शांतीमय रीत विराळी जी

जरा रुजवावे स्वतःला, अंकुरांच्या खुशीसाठी
जरा मृण्मय होता यावे, परिमळांच्या कुशीसाठी

दि.०४/०८/२०२३
पहाटे ०५.३२ वा.



## (५०)
## दान मिळेल नभाचे

ऋतू अंथरला ऋतू मंतरला
रंग कोणते कसे
मनी मदनाचा फुले पिसारा
मधुमास हा वसे

पानोपानी रंग वेगळे
तो सांडून देतो ना
झाडे वेली रम्य सुगंधही
तो मांडून देतो ना

वारे गंधित हलके हलके
उडतील अवकाशी
तशा मीलनाच्या या आशा
फुलती परागाशी

रंग गुलाबी गेले पसरून
गुलाबी तरुतळ सारे
मखमल गेली पसरून पदतळी
पसरले शीतल तारे

इथे घालवला एक जरी क्षण
सार्थक युगायुगाचे
प्रीत पडेल जी पदरी मोहून
दान मिळेल नभाचे

दि.२०/०३/२०२३
सकाळी ०८.५७ वा.



## (५१)
## **मनसोक्त फुलून घ्या**

ऋतू किती सुंदर ना हा
सगळे हिरवे हिरवेगार
निसर्गाच्या लावण्याचे
रंग सारे निराळे फार

डोंगर बोडखे असताना ते
कसेतरीच वाटायचे
पाऊस बरसून गेला आणि
रम्य सारे भेटायचे

मिळेल तिथे उगवून वाढून
पसरून गेली हिरवाई
नजरेत किती साठवून घ्यावी
हरित सुंदर बरवाई

मन ओसाड विराण होतेच
झळा त्याच्या बसतातच
कुठून तरी सर येते
आशा नव्याने हसतातच

फुलता येईल तेव्हा मग
मनसोक्त फुलून घ्या
पुन्हा ऋतू बदलला तरी
आठवणींचं गाव द्या

बाहेर ऋतू सहाच तरी
मनात वसती अगणित हो
एक क्षण एक ऋतू
जीवनानंद द्विगुणित हो

दि.२३/०७/२०२३
सकाळी ०९.२७ वा.



## (५२)
## ऋतू खुलावे असे सोहळे

भरलेल्या आभाळाची चादर ओढून घेते
ही धरणी भिजलेली कशी मोहरून जाते

अंगोपांगी दवबिंदूंच्या मोत्यांची ही साडी
रानोमाळी गवतफुलांची कुजबुज चाले थोडी

आज ही धरा दिसते सुंदर कुठून लाज उमटली
प्रियतम भेटीसाठी उत्सुक पाकळीत कळी मिटली

हे क्षण मोहक बरसण्यातले अलगद जपणे आहे
ऋतू खुलावे असे सोहळे आपसुक मोहणे आहे

हे नाते ना कुणा कळावे हृदय कोंदणी ठेवू
पुन्हा एकदा बेधुंदीच्या वर्षावातच न्हाऊ

दि.०३/०८/२०२३
सकाळी ०८.४३ वा.



(५३)
## ऋतुराज रंगताना

या हासऱ्या फुलांचे
हासू टिपून घ्यावे
वेलीवरी मनाला
अलवार उमलू द्यावे

आतून रंग यावे
अंगावरी रुजावे
कोशी पराग असता
वाऱ्यावरी निजावे

स्वच्छंद मंद गंध
पसरून दरवळावे
मोदात आपुल्या नादी
हुरळ हुरळ हुरळावे

फुलपाखरास थोडी
जागा दळी मिळावी
फुलराणी फुलली आहे
वनी वारता कळावी

मन माझे पुष्प व्हावे
ऋतुराज रंगताना
हरपून भान जावे
सृष्टीत दंगताना

दि.१४/०८/२०२३
दुपारी ०४.३३ वा.



## (५४)
## अशा ऋतूची कर आळवणी

रिमझीम रिमझीम पाऊस धारा
कुठे कोसळती शीतल गारा
बेधुंदीच्या धुंदीमध्ये
नाचत वाहत सुटतो वारा

कुठे कोणते राग भरातून
मनमोहन हा सूर ताडीतो
वेणु वाजे गोड स्वरांनी
मल्हाराची तान छेडितो

मनमोराचा फुले पिसारा
वर्षारागी हर्षची सारा
जलधारांनी काळीज पाणी
मातीमधला गंध फवारा

अशा ऋतूची कर आळवणी
जल मेघांचे मोतीय गाणी
पाणी स्वर्गातील अवतरते
भिजुनी भिजवुनी जाते आणि

असे असावे सुख हे सुखाचे
नाद वेगळा छंद आगळे
ओलीत्याच्या ओळींमधले
गाव पावसी भिजते सगळे

दि.३१/०८/२०२३
सकाळी ०८.३२ वा.



## (५५)
## ऋतू बहराचा सुंदर

बहरुन आल्या झाडासाठी
ऋतू बहराचा सुंदर
त्या बहरासाठी किती परि
वेचले कष्ट अपरंपर

बीज भेदूनी फोडून घेतले
देहाला चिरफाडून
आतून उगवे कोंब कोवळा
जपणे जीव ओतून

मुळे जन्मभरी गाढून घेती
अस्तित्वाला मातीत
उन्हे झेलूनी तरु कोवळा
रापे पाती पातीत

वादळे कधी बेफाम वाहती
उन्मळून टाकण्या त्यांना
तरी तग धरणे शक्तिनिशी नित
झेलून उधाण वाऱ्यांना

सरी बरसती हलक्या हलक्या
असे नेहमी नाही
अतिवृष्टीचे पावसाळेही
झेलावे मग काही

कधी दुष्काळी स्थिती ओढवता
सुकणे ठरलेले ना
परि आत जे उगवून जगण्या
आशा कोंब उरलेले ना

कुठार पडते छातीवरती
कुण्या निष्ठुराकडूनी
कधी रोजचे पक्षी जाती
घरटे सोडून उडूनी

तरी साहतो वृक्ष बिचारा
सारे मूकपणाने
येता वसंत सुखाची ओंजळ
भरतो घाऊकपणाने

फिटून जाती पांग त्या क्षणी
खुणा आतल्या झाकून
ओरबडे ते निज दुःखाचे
फुंकरताना आतून

दि.०३/११/२०२३
सकाळी ०९.५९ वा.



## (५६)
## ओलाव्याच्या रम्य कथा

आले भरून आभाळ
चिंबवून गेले रान
टपटप थेंबातून
अमृताचे होई गान

ओल्या मातीचा सुवास
गेला उंच आकाशात
नव्या ऋतूची चाहूल
चांद रात प्रकाशात

भाव भरून आलेले
झाले मन ओले ओले
मन मोरनी होऊन
पावसात कसे डोले

कुठे कोरडा डोंगर
कुठे भरला सागर
पडताच मोती थेंब
भरे सुखाचा आगर

ओलाव्याच्या रम्य कथा
किती शोषतात व्यथा
मला आठवून जाती
गुंजणाऱ्या थेंबगाथा

दि.१४/१०/२०२३
रात्री १०.४४ वा.




## (५७)
## कोसळताना दिसणे सुंदर

उधाणलेल्या धबधब्याला
सांगा कसे सावरू
कोसळणाऱ्या भाव प्रपाता
कसे प्रिया सावरू

कधी काळचे साठून राही
मनात चित्रे काढून पाही
किती रंगले तरी तरसणे
ऋतू वर्षावाविना न काही

मेघडंबरी अंबर जेव्हा
जडावलेले वाहून ओझे
कोसळते ते हलके होण्या
कुणी कोसळते जडवून बोझे

आधी चढणे उंचावरती
मग देणे ते ढकलून खाली
उगाच किचकीच विचार अती ते
कोण वाहते चिंता पखाली

द्या ना सोडून पडू द्या कोठे
कोसळताना दिसणे सुंदर
जराजरासे बदलून जाऊ
जगू मनाने असे कलंदर

दि.२५/११/२०२३
रात्री ०८.३२ वा.



## (५८)
## ऋतू मनात शरद हा

शरदाचा स्पर्श तुझा
शब्द चांदण्यांचे
भाव तुझे अलगदसे
टपोऱ्या दवांचे

हिरवाई चोहीकडे
पसरून गेली जशी
तू येता मज जीवनी
आली ही बहार कशी

रात्रींची बेचैनी
अस्वस्थसे मन सदा
आलीस तू अंगावर
लेऊन सुंदर शरदा

चांदण्याची कांती तव
ते मधाळ बोलणे
अमृताची बरसात
मजला त्यात डुंबविणे

जागणे आता किती
सहज शरद रातीला
तू अशी रहा सखी
नित्य मज तू साथीला

पिऊन घेत चांदणे
मी चकोर तृप्त हा
आल्हादा साठवीन
ऋतू मनात शरद हा

दि.१८/१०/२१
सकाळी ०९.३७ वा.



## (५९)
## गारवा

सुटली थंडी कुडकुडकुडी
अंगावर आपसुक घोंगडी

काटे फुलले सरसर किती
दातावर हे दात वाजती

वाजे थंडी आवाज नाही
बोल गोठती आतून काही

गरम पेयाची सोय ही व्हावी
किंचित थंडी उबेत जावी

अंग आकसुनी कोपरा धरी
थंडी आकुंचित तनास हो करी

चूल पेटती जवळ करा
अथवा शेकोटी पेटवा भरभरा

गारवा असा घुमतो आहे
बेभान होऊनी दुमदुमतो आहे

झडती चौघडे आली थंडी
लावा खिडक्या दारे कुंडी

कधी जिवाचा जिवलग भेटून
गारव्यात हा फुले मारवा

कधी वियोगामध्ये तळमळ
अंगाला टोचते ती हवा

गरम रजईतून कुणास शिरणे
कुणी रस्त्यावर कुडकूडून मरणे

थंडी सुखाची गुलाबी होते
बोचरी होऊन गरिबी सांगते

कधी गारवा दुःख उतारा
पोळत्या देहा मनास थारा

कधी गारवा दुःखद वारा
उघड्या नागड्या देहाचा पसारा

ऋतू सांगती कथा आगळ्या
प्रत्येकाच्या व्यथा वेगळ्या

जरा तपासून पसर गारव्या
वाहण्यास तव सीमा रे हव्या

दि.२०/१०/२१
सकाळी ०८.४५ वा.



## (६०)
## माळ दवांची उरते

झाला निशेचा लोळागोळा
थंडी गारठली
डोळा लागतो तिचा प्रभाती
गोधडी पांघरली

अंगावरती काटा फुलला
निशा ही कुडकुडली
कुशीत शिरुनी निशाकराच्या
लाजून गडबडली

चंद्र म्हणाला येई प्रिये तू
चांदणे मज उबदार
वर पसरले धुके बावळे
शहारे आणते फार

शीत ऋतूतील नीज गुलाबी
स्वप्नं ही उरातली
सखे सोबती प्रियवर असता
प्रीतही भरातली

ती चिडली बघ उगा रोहिणी
निशेस घेतो जवळी
म्हणून अबोला धरला तियेने
केली सूर्याला कागाळी

म्हणे दिनकरा उगवून लवकर
द्यावा मज पतीराज
शुद्ध न त्याला निशा लाभता
चमकून जाय नभात

गाली हसला अंशुमाली अन
उषा ही प्रकटली
घट्ट मिठी ती निशाशशीची
दिनपतीमुळे सुटली

कशास येतो ऋतू हा शीतल
वेडा गारवा पसरे
रात्रींना बिलगून जाणारा
प्रियतम मजसी विसरे

इकडे निशेच्या अंगावरती
माळ दवांची उरते
प्रियतम शृंगाराच्या खुणा त्या
पुन्हा पुन्हा मनी स्मरते

दि.१९/०१/२०२२
सकाळी ०६.५३ वा.



## (६१)
## थंडी गुलाबी

थंडी गुलाबी
नशा ही शराबी
तुझ्या मिठीतून राणी
गंध हो शबाबी

थंडी गुलाबी
अंग अंग शहारले
आपसुक मजला प्रिये
जवळी तू असे धरले

थंडी गुलाबी
कोशात बंदी
सुटू नको देऊ देवा
कधी ही पाबंदी

थंडी गुलाबी
मी साठवतो आहे
मोहिनी कवेत माझ्या
स्वर्ग आठवतो आहे

थंडी गुलाबी
ऋतू आवडीचा
कसा बांधून मी ठेवू
समय सवडीचा

थंडी गुलाबी.....

दि.१७/११/२०२२
सकाळी १०.०२ वा.



## (६२)
## ऋतूंना बहरा जुंपावे

बहरला आसमंत सारा
गाभूळला वेडापिसा वारा
ढगाने गाळल्या गारा
फुलविला मनाने पिसारा

फुलांच्या कोंदणी गंध
प्रियेच्या ह्रदयी ह्रदय बंद
मोहवी कस्तुरी सुगंध
प्रिया सहवासाचा छंद

रंग सारे सारे खुलले
फुलेही हळूवार उमलले
पाखरं फुलांवरी भुलले
लाजुनी फुलं जरा वळले

धुंद परागांच्या कोशी
भृंग पुष्पांच्या बाहूशी
कळी कळी होतसे कसनुशी
लपेना लपवूनी ही खुशी

बहर हे कधी न संपावे
प्रहर हे सदाच गुंतावे
मनोरे आशेचे उंचावे
ऋतूंना बहरा जुंपावे

दि.०१/०६/२०२२
सकाळी ११.५९ वा.



## (६३)
## पहाट ओली दवात न्हाली

पहाट ओली दवात न्हाली
थंडी गुलाबी आली
शृंगाराच्या मधुर महाली
वर्दी हुडहुडी गेली

झोप जाहली साखर गोडी
ऊब हवीहवीशी
कुणी उतरली अप्सरा जणू
झगा धुक्याचा ल्याली

सगळे दिसते पुसट पुसटसे
प्रीत स्पष्ट बघ झाली
मिठीत येते नाविन्याची
सुरभित गंध नवाळी

सूर्य उगवतो हळूहळू जणू
उषा त्यास बिलगली
निसर्गातुनी थंडीची किती
मस्त मजा चालली

चंद्र कुशीतुन निजला अजुनी
रजनी झोपाळलेली
स्वप्नं प्रियेला सांगताच मग
लाज गाली उमटली

पहाट ओली अंग चोरटी
ऋतुराणी शहारली
ऋतू थांबला न्याहळत तिजला
ती आपसुक जवळी आली

दि.२४/०१/२०२२
सकाळी ०९.०९ वा.



## (६४)
## मोहक निखळसे गाव सरळसे

ऋतू नांदतो अन बागडतो
रानी वनी मज अंगणातुनी
चित्र रेखितो कोण सुरेखसे
रंग लिंपुनी नभंगणातुनी

इथे उतरतो नंदनवनीचा
गंध भारला अवखळ वारा
आणि पिकांच्या लुसलूस कवळ्या
उडवीत जातो बटा फुलारा

हिरवे पिवळे बहर भराचे
आणि उतरणी लागते आशा
पुन्हा वाट ती वाट खुणावे
आत मनाशी प्रीतुळ भाषा

कुठे हरवले क्षण ते सुंदर
आत टोकरी भरली आहे
सख्या तुझी रे मधुर आठवण
हृदय कोंदणी उरली आहे

रोपांमधले निरोप आपुले
हलत्या डुलत्या स्मृती बावऱ्या
विसरू न देतील कधीच तुजला
गोड हव्याशा ओंब्या ओवऱ्या

मोहक निखळसे गाव सरळसे
अन प्रीतीची जाण आगळी
रम्य मोहवी त्या दिवसांची
ऋतुराणी मज जगावेगळी

दि.२८/११/२२
सकाळी १०.२२ वा.



## (६५)
## जाणता रंगास त्याच्या

या बदलत्या मोसमाचे
रंग सारे चाहती
आतुनी रसरंग कितीसे
केशराने नाहती

का उगा वेडी ही पाने
फुल होऊन डोलती
सुंदराचे रंग भगवे
अंतरी ते तोलती

झाड झाडे उमलुनी
जीवना नवं पाहती
झुळूक थंडाव्याची आणिक
स्वप्नं काही वाहती

वाटा वेड्या या फुलांच्या
अंथरुनी त्या पायघड्या
प्रेयसीच्या पावलांची
वाट पाहतो केवढ्या

येई कोणी मोहिनी
मोहुनी जाता जरा
हे ऋतू मग सोहळ्यातून
रंग भरती तो खरा

कोण तो वेडा कसा रे
निर्मितो रंगावली
जाणता रंगास त्याच्या
पावली हो पावली

दि.२४/०२/२०२३
सकाळी ०७.१३ वा.



## (६६)
## झिरमिरल्या पाऊसधारा

झिरमिरल्या पाऊसधारा
धुंद जाहला वारा
सख्या तुझ्या आठवणींनी
तनुवर फुलतो शहारा

मंद कोवळ्या कोसळती त्या
नाजुक श्रावण धारा
आणि धुक्याचा गर्द पसरतो
अंधुक दाट पसारा

तुझ्या गंधल्या घट्ट मिठीतच
लाभतो मजला निवारा
लज्जा देते शय्येवरती
तरी कोमलसा पहारा

पाऊस पडतो अविरत वेडा
वेडा परिसर सारा
भिजते माती अत्तर गंधी
आसमंती फवारा

मधेच फुलतो सोनसळी ह्या
उन्हात मोरपिसारा
किती आठवणी चिंब ओलेत्या
राजसा तुझा सहारा
अशातच, राजसा तुझा रे सहारा

दि.०३/०८/२०२२
सकाळी १०.२३ वा.

# लेखिकेचा परिचय


- **डॉ. मंजूषा पंढरीनाथ कुलकर्णी,**

  पीएच. डी. (संस्कृत), नेट (संस्कृत), सेट (शिक्षणशास्त्र), एम.ए. (संस्कृत), एम.एड., राजपत्रित अधिकारी वर्ग १ (महाराष्ट्र शासन, भारत) (सहाय्यक प्राध्यापक - संस्कृत)

  २३१ समर्थ अलंकार, सदनिका क्र. २, कवितांच्या बागेसमोर, विठ्ठल रुक्मिणी मंदिराजवळ, ज्योतीनगर, छ. संभाजीनगर - ४०० ००५

  ई-मेल : dr.manjushak@gmail.com

  मोबाइल : + ९१ ९८२२८ ३९४९१ । व्हाट्सएप; +९१ ९०८२१ ६१५२४


**सध्या :**

- **प्रशासकीय अधिकारी, मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई (महाराष्ट्र)** येथे राजपत्रित अधिकारी वर्ग १ म्हणून कार्यरत.
- महाराष्ट्र लोकसेवा आयोगामध्ये राज्यात सर्वप्रथम स्थान अधिगत आणि राजपत्रित अधिकारी वर्ग १ शासनसेवेमध्ये २२ वर्षांपासून कार्यरत.
- **संस्कृत सल्लागार मंडळाची सदस्य, साहित्य अकादमी, नवी दिल्ली.** **(https://sahitya-akademi.gov.in)**
- व्यापकदृष्ट्या मान्यताप्राप्त संस्कृत भाषातज्ज्ञ, **साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२० प्राप्त,** उच्च शिक्षणातील शैक्षणिक विचारवंत, उच्च प्रशंसित कवयित्री, लेखिका, संशोधक आणि वक्ता.
- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लिखित "वैदिक साहित्याचा इतिहास" (२६० पृष्ठे) या **मराठी पुस्तकाचा (साहित्य अकादमी पुरस्कृत) संस्कृतमध्ये अनुवाद करण्याचा विशेष प्रतिष्ठेचा प्रकल्प** साहित्य अकादमीने प्रदान केला होता, जो पूर्णत्वाला जाऊन साहित्य अकादमीद्वारे अनुवाद प्रकाशित.
- आचार्य बाळाराव **सावरकर लिखित स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या चरित्राच्या (अंदाजे २००० पृष्ठांच्या) ४ खंडांचा अत्यंत सन्मानाचा संस्कृत अनुवाद प्रकल्प** स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक, मुंबई यांनी स्वाधीन केला आहे. त्यापैकी प्रथम खंडाचा अनुवाद पूर्ण झालेला असून प्रकाशनाच्या मार्गावर.

- गेल्या २५ वर्षांपासून, भाषा, साहित्य, संस्कृती, कला, नाटक, शिक्षण आणि भाषेशी संबंधित विधायक कार्याचा प्रसार करण्याच्या ध्येयाने प्रेरित अन् कार्यरत आहे.
- संस्कृतच्या प्राध्यापिका, वसंतराव नाईक शासकीय कला आणि सामाजिक शिक्षण संस्था, नागपूर.
- **महाराष्ट्र शासनाच्या पहिल्या पूर्णवेळ महिला भाषा संचालक आणि महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, महाराष्ट्र शासनमध्ये प्रशासकीय अधिकारी** ह्या पदांवर कार्यभार सांभाळला.
- पुणे विद्यापीठातून पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले
- तसेच पुण्यातील एसएनडीटी विद्यापीठामधून देखील बी.एड. आणि एम.एड. पूर्ण केले.
- एकाच वेळी पुणे विद्यापीठ आणि टिळक महाराष्ट्र विद्यापीठात अव्वल येण्याचा बहुमान मिळवला.
- MPSC वर्ग-एक परीक्षेमध्ये संस्कृत या विषयामध्ये सर्वप्रथम येण्याचा बहुमान
- विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदा, चर्चासत्रे आणि परिसंवादांमध्ये अनेक शैक्षणिक शोधनिबंध सादर केले आणि अनेक प्रतिष्ठित पुरस्कार जिंकले.

**लक्षणीय योगदान :**

डॉ. मंजूषा या भाषा, कला, नाटक, संस्कृती, प्रशासन, साहित्य आणि शिक्षण या क्षेत्रांमध्ये अनेक बहुमुखी भूमिकांमध्ये योगदान देत आहेत. त्या संस्कृतमधील एक प्रसिद्ध प्राध्यापिका, एक प्रसिद्ध वक्ता, एक विचारशील प्रवचनकार, एक वाचक, एक उद्घोषक, एकल-कलाकार-नाट्यकलावंत/सादरकर्त्या, एक कवयित्री, एक संशोधक, एक लेखिका आणि अशा अनेक क्षेत्रांमध्ये नैपुण्य असलेल्या विदुषी आहेत.

गेल्या काही वर्षांमध्ये डॉ. मंजूषा यांनी भाषिक संशोधन, अनुवाद, भाषा आणि कोशविकास आणि भाषा धोरणाची निर्मिती अशा अनेक महत्त्वपूर्ण क्रियाकार्यांचे नेतृत्व केले आहे. शिक्षण, साहित्य, प्रशासन आणि संस्कृती या

क्षेत्रातील त्यांच्या अद्भुत योगदानाबद्दल त्यांना अनेक पुरस्कार आणि सन्मानचिन्हांनी सन्मानित करण्यात आले आहे.

डॉ. मंजूषा यांनी मराठी कवितेच्या क्षेत्रात जागतिक स्तरावर विश्वविक्रमधारक अशी एक अनोखी ओळख निर्माण केली आहे आणि चरित्र, कविता, ललित आणि तात्त्विक तसेच वैचारिक लेखन अशा सर्व संबंधित शैलींमध्ये त्या एक उत्कृष्ट आणि प्रथितयश लेखिका म्हणून चमकत आहेत.

**प्रकाशमार्गा :** हे पुस्तक डॉ. प्रकाश बाबा आमटे यांच्या चरित्राचा (मराठी भाषेतील) डॉ. मंजूषा यांनी केलेला संस्कृत अनुवाद आहे ज्याला २०२० वर्षातील साहित्य अकादमीच्या अनुवाद पुरस्काराने गौरविले गेले. डॉ. आमटे यांच्या या अद्भुत जीवनप्रवासाचा संस्कृतमध्ये अनुवाद करण्यात डॉ. मंजूषा यशस्वी ठरल्या आहेत.

‘‘**साहित्यिक व्रत**’’ म्हणून गेल्या ६ वर्षांपासून, डॉ. मंजूषा रोज काव्यरचना रचत आहेत आणि प्रसारित करत आहेत. त्यानिमित्ताने मराठी कवितेतील ‘हाय रेंज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड’ मध्ये जागतिक विक्रम केल्याबद्दल महाराष्ट्राचे माजी राज्यपाल श्री. भगतसिंग कोश्यारी जी यांच्या हस्ते डॉ. मंजूषा यांचा सत्कार झाला आहे.

**प्रकाशित पुस्तके –**

- डॉ. मंजूषा यांनी मराठी, संस्कृत आणि इतर भाषांमध्ये अनेक उत्तम पुस्तके लिहिली आहेत आणि त्यांचे पहिले पुस्तक ‘विवाह संस्कार’ २०१० या वर्षी प्रकाशित झाले. त्यानंतर डॉ. मंजूषा यांनी संस्कृतमधील इतर अनेक पुस्तके प्रकाशित केली आहेत ज्यामध्ये श्यामस्य माता, विवेकानंदस्य विचारसौंदर्यम्, वेदकालीन स्त्रीरत्नानि, स्मृतिवचनानि, स्मृतिप्रतिपादित न्याय:, विवेकरत्नानि, प्रकाशमार्गा : अशी अनेक पुस्तके संस्कृतमध्ये रचली व अनुवादित केलेली आहेत. तर ‘प्राचीन भारतीय समाज’, ‘सूर्य शक्ती और मानव’, ‘कौटिलीय अर्थशास्त्र’, ‘स्मृतीग्रंथ – भाग १ और २’ ही त्यांची हिंदी भाषेतील पाच पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

त्यांच्या मराठीतील पुस्तकांमध्ये अनमोल विचार ठेवा – नचिकेता (लेखांचा संग्रह), लावण्यखणी (मराठी लावणी गाण्यांचा संग्रह), कणखरबाणा राणी अहिल्या (अहिल्याबाई होळकर यांचे चरित्र), बकुळफुले (फुलांवरील कविता), मृद्‌गंध (ग्रामीण मराठी भाषेतील कवितांचा संग्रह), एक पाती गवताची (ललित लेखसंग्रह), प्रीतसुधा, आरसपाणी–जीवनगाणी (मानवी जीवनावरील कवितांचा संग्रह), गोड–गोड पापा (बालकवितांचा संग्रह), सर्ग–निसर्ग, संतोष, उत्कर्ष, पूर्वा (निसर्गावरील कविता), नाथा पंढरीनाथा, ईश भाग्येश (देवभक्तीपर), मंगेश, आंदण (प्रासंगिक), रूप–स्वरूप (राधाकृष्ण), अलवार (ऋतू) यांचा समावेश आहे.

याशिवाय विज्ञानातील संस्कृत, स्मृती धारा भाग–१ आणि भाग २, चतुरंग, शोधामृत, संस्कृत मराठी उखाणे, गौरवगाथा सूर्याची, जीवनचिंतन, भावमंजूषा, विचारकणिका, वेदकालीन स्त्रीरत्ने आणि अणुविज्ञानातील झंझावात – डॉ. अनिल काकोडकर, प्राचीन भारतीय समाज. ही पुस्तके देखील प्रकाशित आहेत. त्यांचे मराठीमध्ये 'मंजु मंजिरी' आणि 'सर्ग निसर्ग' नावाने ऑडिओ कवितासंग्रहही प्रकाशित झालेले आहेत.

**प्रकाशनाच्या वाटेवरील पुस्तके –**

(राधाकृष्ण) – श्रीरंग, कृष्णकांत, (निसर्गपर) – सृष्टीगंध, (चंद्र) – सुधांशु, (सूर्य) – दिव्यांतरी, (प्रीत – तिच्या मनातील कविता) – नादश्रुती, श्वेता, (सकाळ–संध्याकाळ) – लाघव वेळा, (वेळा) – तेंव्हा, (प्रेम – त्याच्या मनातील कविता) – प्रियतमा शुभांगी, नेहा, सुधीर, (मिश्र कविता) – गंधराणी, हृदयस्पर्शी, कवडसा, मृण्मयी, अबोली, (ऋतू) – मधुश्री, सहा सोहळे, (फुले) – अळुमाळु, सुरभी, (पशु) – खाणाखुणा, (पक्षी) – वैष्णवी, (स्त्रीजीवन) – स्वामिनी, मृणालिनी, (धरती–आकाश) – प्रमिला, नभ मोजताना, (जीवनपर) – मनमंदिरा, तेजशलाका, उदय, मंजुभारती, (पाऊस कविता) – श्रावणी, (गझल) – उल्का, (रसिकप्रतिक्रिया – कवीश्वर) – बोल बरवे, (अन्य रसिक प्रतिक्रिया) –प्रतिसाद, रसिकवरा, हृदयतरंग, अनुबंध (वाट) – जरा रेंगाळले, (Audio - Book) – युगंधरा, कामिनी, (रंग) – रंगतनु, (गझल) – मनस्विनी, (सर्वोत्कृष्ट कविता) – माझी कविता, (ललितलेख) – मन्मनी, इंदुमती, मंजुश्री, मानसी.

**मिळालेले पुरस्कार :**

**पुरस्काराचे नाव आणि वर्ष –**

- कोकण मराठी साहित्य परिषदेचा अत्यंत मानाचा २०२२–२३ चा ललित गद्य विभागातील द्वितीय क्रमांकाचा सौ. लक्ष्मीबाई व राजाभाऊ गवांदे पुरस्कार 'एक पाती गवताची' या ललितलेखसंग्रहास प्राप्त झाला आहे.
- शिक्षाश्री सन्मान – २०२४
- स्व. वा.ना. उत्पात स्मृती पुरस्कार – २०२३
- परळी भूषण पुरस्कार २०२३
- मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय २०२३ पुरस्कार (गौरव गाथा सूर्याची साठी)
- संस्कृत भाषा सभा नाशिक, महाराष्ट्र तर्फे डॉ. व्ही. एम. गोगटे स्मृती पुरस्कार २०२३
- अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक २०२२ तर्फे सन्मान आणि सत्कार
- अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, वडोदरा तर्फे ''साहित्य रत्न'' पुरस्कार २०२२
- सरस्वतीदेवी विद्या विकास ट्रस्ट पुरस्कार २०२२
- प्रेमचंद सन्मान २०२२
- अणुविज्ञानातील झंझावात : डॉ. अनिल काकोडकर – ३ राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त
- महात्मा फुले राज्यस्तरीय बाल–साहित्य पुरस्कार (महाराष्ट्र साहित्य प्रतिष्ठान) २०२१
- राज्यस्तरीय संत नामदेव चरित्र साहित्य पुरस्कार २०२०
- लेखक सुनील रंगराव देसाई राज्यस्तरीय बाल–साहित्य पुरस्कार २०२९
- संस्कृतसाठी साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२०
- राष्ट्रपती पुरस्कार विजेते दिवंगत व्ही.डी. सर्जे गुरुजी प्रतिष्ठानचा जीवन गौरव पुरस्कार २०१८

- पत्रकार उत्कर्ष समिती (मुंबई)चा राज्यस्तरिय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२७
- शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ आष्टी जि. बीड (महाराष्ट्र) चा राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार
- द्वारका प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय सर्वोत्कृष्ट प्रशासक पुरस्कार
- गोस्वामी संत तुलसीदासकृत रामचरित मानस पुरस्कार २०२६
- राज्यस्तरीय दैनिक भास्कर महिला पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय लोकमत सखी सम्राज्ञी पुरस्कार २०१२
- दिल्ली संस्कृत अकादमी, अखिल भारतीय-नवोदित - संस्कृत कवि प्रतियोगिता पुरस्कार २०१२
- लोकमत माझी आई पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय महिला गौरव पुरस्कार २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - संहितालेखन प्रथम पारितोषिक २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - नाट्य द्वितीय पारितोषिक २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०१०
- S.N.D.T. महिला विद्यापीठ, सर्वतृतीया २००१
- मध्यप्रदेश संस्कृत अकादमी राष्ट्रीय निबंध रचना पुरस्कार १९९८
- महाराष्ट्र राज्यशासन संस्कृत प्राविण्य पुरस्कार १९९८

- **Digital Content :**

| अ.क्र. | तपशील | लिंक |
|---|---|---|
| १ | सखी सह्याद्री मुलाखत, दि. १०-१०-२०२४ | https://www.facebook.com/share/v/FmEuAjAVeKGrunYB/?mibextid=WC7FNe |
| २ | सोनाली नवांगुळ, डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमीचा अनुवादासाठी पुरस्कार | https://www.loksatta.com/pune-news/sonali-nawangul-dr-manjusha-ku-lakarni-sahitya-akademi-award-for-translation-akp-94- 2600116 ?utm_source =whatsapp_web & utm_medium =social& utm_campaign=socialsharebuttons |
| ३ | ''आपल्यालाच आपला प्रकाश होता आलं पाहिजे.'' साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाल्या नंतर मंजुश्री यांनी दिलेला हा संदेश आपल्या सर्वांसाठी साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या डॉ. मंजूषा कुलकर्णी MaxWoman वर. | https://youtu.be/Lqu-YF4G-rw |
| ४ | डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमी पुरस्कार | https://www.madhyamvruttseva.com/डॉ-मंजूषा-कुलकर्णी-यांचा/ |

| | | |
|---|---|---|
| ५ | महाराष्ट्राचे माननीय राज्यपाल यांचे ट्वीट | <https://twitter.com/maha_governor/status/ @maha_governor 1439559856764030979 ?s=08 <https://twitter.com/maha_governor/status/1439559859536482304?s=08 |
| ६ | संस्कृत भाषाव्रताचा सन्मान 'प्रकाशवाटा' या डॉ. प्रकाश आमटे यांच्या आत्मचरित्राचा संस्कृत अनुवाद डॉ. कुलकर्णी यांनी 'प्रकाशमार्गा:' | https://www.loksatta.com //lokrang/sahitya-akademi-award-for-translation-autobiography-of-prakash-amte-poet-prof-dr-manjusha-kulkarni-prakashwata-zws-70-2612674/lite/ ?utm_source=whatsapp_web&utm_medium=social&utm_campaign=socialsharebuttons |
| ७ | https://mr.wikipedia.org | https://mr.wikipedia.org/wiki/मंजूषा_कुलकर्णी |
| ८ | प्रा.डॉ. मंजूषा कुलकर्णी यांचा महाराष्ट्र राज्याच्या मा. राज्यपालांच्या हस्ते अभिनव साहित्यिक विक्रम केल्याबद्दल सत्कार | https://youtu.be/6x7BRzz_seo |

| | | |
|---|---|---|
| ९ | प्रशासक आणि संस्कृत विद्वान - डॉ. मंजूषा कुलकर्णी यांच्याशी भेट (डीडी न्यूजद्वारे) | https://youtu.be/7a5dNUZKnRk |
| १० | @MahaGovtMic | https://twitter.com MahaGovtMic/status 1476551366352924672?s=08 |
| ११ | कवयित्री डॉ.मंजूषा कुलकर्णी यांचा जागतिक काव्य विक्रम केल्याबद्दल राज्यपालांच्या हस्ते सत्कार 'साहित्यिक व संतांनी देश एकसूत्रात बांधला' भगतसिंह कोश्यारी | https://twitter.com/InfoVidarbha/status/1418559733921816580?s=20 |
| १२ | साहित्याच्या पारावर डॉ. मंजूषा कुलकर्णी सखी सह्याद्री – डीडी सह्याद्री दूरदर्शन मुंबई | https://youtu.be/VEJcY4GX7tg |
| १३ | सखी सह्याद्री | <https://youtu.be/ITLxInwuJc ; https:/youtu.be/7a5dNUZKnRk |
| १४ | खास कार्यक्रम / नवदुर्गासह डॉ.मंजूषा कुलकर्णी / नवरात्री स्पेशल / सकाळ मीडिया | https://youtu.be/m1Ot_LzxI4k |

| | | |
|---|---|---|
| १५ | मनीषा नवपुते यांची फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/story.php?story_fbid=126653350529198id=100015176343763&sfnsn=wiwspwa |
| १६ | संजीव खानझोडे यांची फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/story.php?story_fbid=4429100480484776 id=100001546044035 sfnsn=wiwspwa |
| १७ | ऑडिओ अल्बम - ''सर्ग_निसर्ग'' ऑडिओ अल्बम - ''मंजुमंजिरी'' | <https://vy6s8.app.goo.gl/NKnJ> https://vy6s8.app.goo.gl/A8Z5 |
| १८ | Special Screening of 100th Episode of Mann Ki Baat from Raj Bhavan | https://www.youtube.com/live/7-dyWQaLA?si=mid7qSf_HIM6WQ8q |
| १९ | स्वामी विवेकानंद व्याख्यान : भाग - १ | https://youtu.be/TrNMBV_ysf8?feature=shared |
| २० | स्वामी विवेकानंद व्याख्यान : भाग -२ | https://youtu.be/NpvMk-Pu4dOs?si=typfHtOvNg-1hDXgT |

**सारांश :**

- एकूण अनुभव (शैक्षणिक) : २२ वर्षे
- एकूण अनुभव (प्रशासकीय) : १३ + वर्षे
- व्याख्याने आणि भाषणे : १००० पेक्षा जास्त
- प्रवचने : ५०० हून अधिक
- शोधनिबंध प्रकाशित : १०० हून अधिक
- स्वलिखित पुस्तके (प्रकाशित) : ५५
- स्वलिखित पुस्तके (आगामी) : ४८
- संशोधन प्रकाशने : १६
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत सहभाग (आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय) : ४०
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत स्रोत-व्यक्ती / तज्ज्ञ म्हणून सहभाग : २०० हून अधिक
- पुरस्कार : २०० पेक्षा जास्त
- मिळालेल्या शिष्यवृत्ती : ९
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. पदवी प्राप्त विद्यार्थी : ०५
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. संशोधन कार्य सुरू असलेले विद्यार्थी : ०४

• • •